शनिवार, २९ एप्रिल २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२३४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SATURDAY 29 APRIL 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-234 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-10 ● PRICE-5




# पोलिसांना शरम वाटत नाही का ?

## मा. खा. राजू शेट्टी : बारसू रिफायनरीविरोधी आंदोलन पेटले

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी : येथील बारसू रिफायनरी प्रकल्प विरोधी आंदोलकांवर पोलिसांकडून अश्रू धुरांच्या नळकांडा फोडत लाठीचार्ज करण्यात आला. दरम्यान या घटनेचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी तीव्र शब्दात निषेध व्यक्त केला. तेथील शेतकऱ्यांना एकटे पडू देणार नाही, हजारो शेतकऱ्यांना घेऊन मी बारसूत जाईन, असे राजू शेट्टी म्हणाले. त्याचवेळी भूमीपुत्रांना लाठ्यांनी मारता, लोकशाही राज्यात असे वर्तन करायला पोलिसांना शरम वाटत नाही का? असा परखड सवालही त्यांनी विचारला आहे.**



आम्ही सर्वेक्षण बंद पडणारच या भूमिकेवरती ठाम आहेत. पोलीस प्रशासनाने माती परीक्षण होऊ द्या, असं आवाहन केल्यानंतरही शेतकरी ते न होऊ देण्याच्या भूमिकेवर ठाम आहेत. शेतकऱ्यांच्या भूमिकेने त्रस्त झालेल्या पोलिसांनी लाठीमार केला. त्यानंतर अनेकांना पिंजऱ्यात भरुन पोलिसांनी पोलीस स्टेशनमध्ये नेलं. या प्रकाराविरोधात राजू शेट्टी आक्रमक झाले असून त्यांनी शेतकऱ्यांच्या पाठिंब्यासाठी चलो रत्नागिरीचा नारा दिला आहे.जी शेती करतो, ती शेती प्रकल्पासाठी देण्याची शेतकऱ्यांची इच्छा नसेल तर जबरदस्ती कशासाठी ? लोकशाही राज्यात शेतकऱ्यांवर जोर जबरदस्ती करत आहे. पोलिस शेतकऱ्यांना मारझोड करत आहेत, त्यांना शरम वाटत नाही का ? असे सवाल करुन राजू शेट्टी यांनी सत्ताधाऱ्यांवर आसूड ओढलेत.

बारसू महाराष्ट्रातच आहे की आणखी कुठे ? असा संतप्त सवाल त्यांनी विचारला आहे. तसेच जर तुम्ही ते काहीच शेतकरी आहेत असे समजत असाल तर राज्यातील सर्व शेतकरी आम्ही एकत्र आणू आणि बारसूच्या शेतकऱ्यांमागे ताकद उभी करु, असा सांगत चलो रत्नागिरीचा नारा त्यांनी पुकारला आहे. दरम्यान स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते प्राचार्य जालिंदर पाटील यांच्यासह कार्यकर्ते रत्नागिरी येथील बारसूला निघाले असता त्यांना देखील पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.बारसूचे ग्रामस्थ कोणत्याही परिस्थितीत



# अवकाळीमुळे शेतकरी हवालदिल

## द्राक्ष, आंबा, चिकू, मका, पिकांचे नुकसान

आधुनिक केसरी न्यूज

**ज्योती खिलारे**

**पंढरपूर :** तालुक्यातील कासेगाव, सिध्देवाडी, अनवली, तनाळी, तावशी, खर्डी, गोपाळपूर, सरकोली, चिचंबे, एकलासपूर, नेपतगाव, ग्रामीण भागातील दिवसभर उन्हाचा तडाका बसत बसताना सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास मोठया प्रमाणात सोसाट्याच्या वाऱ्यास विजांच्या कडकड्या सोबत पावसाची दमदार सुरुवात होते. गेले दोन दिवसापासून पंढरपुर ग्रामीण भागांमध्ये मोठ्या प्रमाणात अवकाळी पाऊस पडल्यामुळे शेतकरी राजा हवालदिल झालेला आहे. गेल्या दोन दिवसापासून तापमानामध्ये चढ - उतार होत असलेले चित्र दिसत आहे. या बदलत्या वातावरणाचा फटका लसूण, कांदा, द्राक्ष, डाळिंब, आंबा व भाजीपाल्यासह अनेक पिकांना मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. हाता तोंडाशी आलेली पिके जमीनीदोस्त झाली. यामुळे शासनाने नुकसान झालेल्या पिकांचे तातडीने पंचनामे करून मदत जाहीर करावी अशी मागणी सर्व सामान्य शेतकरी वर्गातून होत आहे.





# याचिका दाखल करणारे तुम्ही कोण ?

आधुनिक केसरी न्यूज


**मुंबई :** काही दिवसांपूर्वी शिवसेनेची ( ठाकरे गट ) संपत्ती एकनाथ शिंदे यांच्या गटाला देण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली होती. ही याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. तसेच, याचिकाकर्त्यांला सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे. 'याचिका दाखल करणारे तुम्ही कोण ?', असा सवाल न्यायालयाने विचारला आहे. 'शिवसेना' नाव आणि 'धनुष्यबाण' चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या गटाला देण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला होता. त्यानंतर एकनाथ शिंदे शिवसेनेचे मुख्यनेते बनले होते. त्यामुळे शिवसेना भवन आणि पक्षनिधी एकनाथ शिंदे यांच्या गटाला देण्यात यावा, अशी याचिका वकील आशिष गिरी यांनी १० एप्रिल २०२३ ला सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. यावर आज ( २८ एप्रिल ) सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या खंडपीठासमोर सुनावणी पार पडली. तेव्हा सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी आशिष गिरी यांना खडसावले आहे. ही याचिका दाखल करणारे तुम्ही कोण ?, असा प्रश्न उपस्थित करत सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी याचिका फेटाळली आहे. याचिका दाखल केल्यावर आशिष गिरी यांनी सांगितले होते की, सर्वोच्च न्यायालयाने एकनाथ शिंदेंना पक्षाचे अध्यक्ष म्हणून कायम ठेवलं, तर शिवसेना भवन, निधी आणि सर्व शाखा त्यांच्याकडे हस्तांतरित करण्यात याव्या. तसेच, निकाल लागेपर्यंत निधी वापरण्यावर निर्बंध घालण्यात यावा.


# लखमापूरला भरदिवसा मंदिरात चोरट्यांचा दानपेटीवर डल्ला

आधुनिक केसरी न्यूज


लखमापूर : दिंडोरी तालुक्यातील लखमापुर येथील श्री खंडेराव मंदिर व श्री वाघेश्वरी माता मंदिरातील दोन दानपेट्या भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी फोडल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. लखमापुर येथे प्रसिद्ध असणारे वाघेश्वरी माता मंदिर व कुलदैवत खंडोबा मंदिरातील दोन्ही दानपेट्या अज्ञात चोरट्यांनी भरदिवसा फोडून दोन्ही दानपेट्यातील अंदाजे हजारो रूपयांचा मुद्दे माल चोरट्यांनी चोरून नेला. त्यामुळे भाविक भक्तांमध्ये संतापाची लाट पसरली आहे. मंदिरात सकाळी व संध्याकाळी महाआरती होत असते. सकाळी दहा नंतर मंदिर बंद करण्यात येते. तेव्हा चोरी झालेली नव्हती. परंतु दुपारी चार वाजता जेव्हा उघडले तर मंदिरातील दोन्ही दानपेट्या तोडण्यात आल्याचे लक्षात आले. मंदिराच्या मागेच्या दरवाज्याची कडी वाकून चोरट्यांनी मंदिरात प्रवेश केला आहे. विशेष म्हणजे मंदिरातील त्रिशुळांच्या साह्याने दोन्ही दानपेट्याच्या कड्या तोडण्यात आल्या आहेत. दोन्ही मंदिरातील दानपेट्या या फक्त वार्षिक यात्रेच्या दिवशी उघडण्यात येत असल्याने या पेट्यामध्ये हजारो रूपये असल्याचे स्थानिकांकडून बोलले जात आहे. भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी ही चोरी केल्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

मंदिरात दानपेट्या अज्ञात चोरट्यानी फोडून अंदाजे काही हजारो रुपयाच्या आसपास रक्कम चोरट्यांनी चोरून नेल्याने . नागरिकांनी आता मंदिर परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी केली आहे . त्यामुळे अशा अज्ञात चोरांचा लवकर बंदोबस्त करता येईल . तेव्हा अशा चोराचा लवकर शोध घेऊन त्यांना शासन व्हावे अशी मागणी नागरिकांनी केली आहे .






या घटनेची माहिती वणी पोलीस ठाण्यात देण्यात आली. वणी पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक निलेश बोडके यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक रामकृष्ण सोनवणे, पोलीस हवालदार कमलेश देशमुख, पवार आदी घटनास्थळी येऊन परिस्थितीची पाहणी करून पंचनामा केला. लवकरच चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या जातील असे आश्वासन दिले. पुढील तपास करीत आहेत.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

पर्यावरणाचे त्यांनी एक प्रकारे मोठे संरक्षण केले आहे. शिवाय भुकेलेल्यांच्या पोटात दोन घास गेल्याचे समाधान वेगळेच आहे. अशाच प्रकारचे कार्य मुंबईतील डबेवाले सुद्धा करीत आहेत. त्यांनीही रोटी बँक सुरु केली आहे. आणि हॉटेल्स, मंगल कार्यालये, मॉल्स इ ठिकाणाहून उरलेले आणि वाया जाणारे अन्न ते गोळा करून भुकेलेल्यांपर्यंत पोहोचवतात. डहाणू, भिवंडी, जव्हार, मोखाडा इ ठिकाणी आदिवासी मोठ्या प्रमाणावर राहतात. अन्नाच्या अभावी कुपोषणाचे मोठे प्रमाण त्यांच्यात आहे. या भुकेलेल्यांपर्यंत तसेच मुंबईतील विविध हॉस्पिटल्स मध्ये पेशंटच्या बरोबर आलेल्या आणि उपाशीपोटी राहणाऱ्या लोकांपर्यंत हे अन्न पोहचवण्याचा प्रयत्न ते करतात. एका अहवालानुसार भारतात दरवर्षी भूकबळी जाणाऱ्यांची संख्या ७ हजारांवर आहे. तर वीस कोटी लोकांना एक वेळ उपाशी झोपावे लागते. केवळ औरंगाबाद शहरातील एका उच्चभ्रू वस्तीतून दररोज सरासरी ३०० पोळ्या, भात कचऱ्यात फेकला जातो. अन्न वाचवा समितीचे लोक हे वाया जाणारे अन्न वेगळे गोळा करून त्याचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करीत आहेत. त्याविरुद्ध जनजागृती करीत आहेत. शहरातील विविध कार्यालयात या समितीने अन्न वाचवा असे आवाहन करणारे फलक लावले आहेत. ही अन्नाची नासाडी आपल्याला परवडणारी नाही. तसेच जो शेतकरी दिवसरात्र घाम गाळून शेतात राबतो, आणि आपल्याला अन्न पुरवतो त्याचाही हा एक प्रकारचा अपमानच आहे. म्हणून आपणही आपल्या परीने या सत्कार्याला हातभार लावू या. आपल्याकडून अन्न तर वाया जाणार नाहीच, पण आपल्या अन्नातील एक भाग आपण या भुकेलेल्यांकरिता जर आपण देऊ शकलो, तर भारतीय संस्कृतीत सांगितलेले अन्नदानाचे पुण्य अनायासे आपल्याला मिळेल. आणि कोणाची तरी भूक भागवू शकल्याचे समाधान. शेवटी ' अन्न हे पूर्णब्रह्म ' आहे हे लक्षात घेऊ या. आकाशातला चंद्र नाही मिळाला तरी चालेल, पण भाकरीचा चंद्र प्रत्येकाला मिळायला हवा.

## अन्न हे पूर्णब्रह्म...





## आनंदी पहाट

### आपल्या विचारांमधील उणिवा दूर कराव्यात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

दैनंदिन जीवन जगत असताना वर्तमानांत आपण काहीतरी शोधत असतो. हा शोध नेमका कशाचा असतो ह्याचा अंदाज अनेकदा आपल्याला येत नाही. खरं तर हा शोध आनंद प्राप्तीचा असणं आवश्यक असतं. अर्थात, प्रत्येकाची आनंदाची व्याख्या जशी निराळी असते, तशीच अनुभूती देखील वेगवेगळी असणं स्वाभाविक असतं. आपापल्या अनुभूती आणि प्रचीतीनुसार आपली आनंदाची व्याख्या तयार होत असते. आनंद आपल्या अंतरंगात निर्माण होत असतो. आपल्या विचार, वर्तन आणि व्यवहारावर तो निर्माण कसा, किती आणि कधी होतो? ते अवलंबून असतं. अनेकदा आपल्या अंतर्मनातील विचारांमध्ये आपण गुरफटले जात असतो, अगदी न कळत होत असतं तसं. आपल्या अंतर्मनांतील विचारांना विशिष्ट दिशा, गती अथवा विषय असतीलच असं नाही. दिवसभरात आपल्या मनांत आलेले सर्वच विचार, तसं बघितलं तर, आपल्या लक्षात देखील राहतातच असं नाही. ह्या विचारमंथनात आपल्याला वर्तमानातील वास्तवाचं भान राहणं महत्वाचं असतं. पण भूतकाळाच्या साठवणीतील आठवणीत रमलेल्या आपल्या अंतर्मनाला दुसरीकडे भविष्याची काळजी, चिंता करायची देखील सवय जडलेली असते. आजचा दिवस माझा, ह्या भावनेतून, दृष्टीकोनातून आपले विचार, वर्तन, व्यवहार होण्याची जाणीव होत राहणं महत्वाचं ठरतं. अनेकदा तसं आपल्याकडून घडत नाही. आजच्या दिवसातील आनंद लुटायचा सोडून आपण उद्याची विवंचना, चिंता, काळजी, दडपण अशा सर्वच नकारात्मकता निर्माण करणाऱ्या विचारांना कवटाळत बसत असतो. कशाला उद्याची बात? असा ठोस प्रश्न आपण स्वतःला कधी विचारतो का हो? विचारलाच तरीही त्याचं सकारात्मकता निर्माण करणारं उत्तर आपल्याला मिळतं का? हाच खरं कळीचा मुद्दा आहे. ह्याची जाणीव न होणं हीच उणिव म्हणायची का?



आधुनिक केसरी

**इंद्रायणी माता | पान्हा ||**

स्नेहाळ प्रेमाचा | झरा इंद्रायणी ||
सांगे परावाणी | ज्ञानयोगी ||१||
करावे सार्थक | येऊनिया जन्मा
कर्मयोगी आत्मा | ओळखावा ||२||
अंतरीचे रूप |जणोनिया घ्यावे ||
मौनात पाहावे | आत्मारूप ||३||
एकांती रमता | सखी होते गाथा ||
जन्माच्याच व्यथा | दूर होती ||४||
तुझे माझे सारे | जळोनिया जाता ||
इंद्रायणी माता | पान्हा सोडी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरूपण

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री
सोनपेठकर


**नीरदशोभिते देविनमामि**
**त्वां पुनः पुनः ।चन्द्रहासधरे**
**धात्रीमायुःस्वास्थ्यप्रदायिनीम् ।।८ ।।**
**मेघाप्रमाणे कांती असणारे, हे देवी, मीपुनःपुन्हा प्रणाम करतो. हाती चंद्रहास म्हणजे तलवार धारण करणाऱ्या जगद्धात्री, आयु, स्वास्थ्य प्रदान करणाऱ्या अशातुलामीपुनःपुन्हा प्रणाम करतो.**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

**वेदवीत्त जगमान है, गो मन चंगुल पाश । हीन भक्ति सत्संग से, यह दुखमय बुध नाश ।।३४।। (स्वर्वेद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/३४**

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**

देह, धन, संसारातील प्रतिष्ठा तसेच इंद्रिय आणि मनाच्या विषय-बंधनात फसलेले, सत्संग आणि भक्तीहीन जीवन ज्ञानाचा नाश करणारे असे दुःखमय आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

**संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.**

## देवदर्शन

आधुनिक केसरी




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

समासाच्या शेवटी संपूर्ण 60 ओव्यांचा मागोवा घेतला तर असे लक्षात येते की ,सर्व दिसणारे वस्तू हा सिळा मायेचा पसारा आहे. आणि आत्मस्वरूप तेवढे खरे आहे. जीवाच्या अंतर्यामी स्वरूप असतो तो आत्मा,चराचर विश्वाला आतबाहेर व्यापून असतो तो अंतरात्मा,हे चराचर पण तेवढेच खरे असलेले मायेच्या धाग्याने पक्के बांधले गेलेले,सर्व जीवघटक,स्थित व अस्थित यांना जोडणारा, शुध्द आत्मस्वरूप म्हणजे परमात्मा होय. सगळी शास्त्रे सांगतात की देव शुध्द आणि शाश्वत आहे. आपले जन्ममरण, सुखदुःख भोगणे हे सगळे त्या परमात्म्याच्या मर्जीने चालते,तो सगळ्यात निराळा आहे म्हणून तो देव आहे. मित्रांनो समर्थाच्या समग्र साहित्य संपदेचा अभ्यास केला तर असं लक्षात येते की समर्थांनी सतत कार्यमग्न रहायला सांगितले, सतत काही तरी करत रहा हा तर त्यांचा संदेश आहे.बलोपासने साठी जागोजागी मारूतीची मंदिरे उभारली. गाव तिथे व्यायामशाळा ही संकल्पना समर्थाचीच आहे. यासाठी संपूर्ण तरूणाईला एकसंघ रहाण्याचं बालकडू लहान वयातचं पाजलं. ( व्यायामशाळा )हे त्याचं बोलकं ऊदा हरण आहे. म्हणजेच माणसाच्या अंतरात्म्याचा विचार करून त्यांनी मिथ्या गोष्टींना थारा न देता सगुण आणि निर्गुण ब्रम्हस्वरूपाची माया या सर्वाचा विचार करून देवशोधन हा समास आपल्या पुढे यथायोग्य मांडला आहे.

## सर्वस्वी राहावे रामास अर्पण

आधुनिक केसरी

आता ऐका माझे वचन ।मनाने व्हावे रामार्पण ॥ माझे नातेगोते एक राम ।हा भाव ठेवून जावे रामास शरण ॥ अनन्य व्हावे भगवंती ।जो कृपेची साक्षात् मूर्ति ॥ रामा आता करणे नाही उरले जाण ।तुला आलो मी अनन्य शरण ॥ सुखदुःखाचा दाता ।सत्य नाही दुजा आता ॥ जाणिवेने जैसे घ्यावे ।तैसे मनाने सुखदुःख भोगावे ॥ मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण ।तोपर्यंत नाही समाधान ॥ सर्वस्वी राहावे रामास अर्पण ।हाच उपाय सांगती साधुजन ॥ रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती ।त्याचा मार्ग सज्जन सांगती ॥ प्रयत्नेविण राहो नये ।फळाची आशा ठेवू नये ।भगवंताला विसरू नये ।कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ॥ प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान ।तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ॥ अखंड राखावे अनुसंधान ।येणे कर्म होईल सहज रामार्पण ॥ वृत्ति राखावी अत्यंत शांत ।हेच संताचे मुख्य लक्षण जाण ॥ जे जे घडेल काही ।ते ते रामइच्छेने पाही ॥ असा करावा संसार ।परि असावे खबरदार ।त्राता राम जाणुनी चित्ती ।निर्भय करावी आपली वृत्ति। थोर भाग्य उदया आले ।रामराय घरी आले ।आता व्हावे रामाचे आपण। व्यवहार प्रपंच करावा जतन ॥ न दुज्याचा दोष पाहावा ।त्याचा आपणापाशीच ठेवा ॥ देह आहे परतंत्र ।मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ॥ मनाने जो बांधला ।परतंत्र वाटेल त्याला ॥ शरण गेला रामचरणी ।त्याला नाही दुजी हानि ॥ अखंड करावे नामस्मरण ।नीतिधर्माचे असावे आचरण ॥ बायकोमुले, लहान थोर ।यांनी न सोडावा रघुवीर ॥ काळ फार कठीण आला ।बुद्धिभेद त्वरित झाला ॥ आता सांभाळावे सर्वांनी आपण ।रामाविण न जाऊ द्यावा क्षण ।चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ॥ माझा राम जोडला हे जाणले ज्याने ।त्याला न उरले करणे ॥ राम ठेवील ज्या स्थितीत ।त्यात समाधान मानावे ॥ रामास जे करणे असेल ।ते तो करील ॥ सदा सर्वकाळ माझ्याशी वास ।हाच धरावा हव्यास ॥ त्याला न जावे लागे कोठे ।घरबसल्या राम भेटे ॥ जो करी रामपदांबुजचिंतन ।तयास नाही यमाचे बंधन ॥ संताची सेवा केली ।महद्भाग्य घरी आले ॥ एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ॥ तोच खरा धन्य धन्य ॥ संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास ॥



**आजचे बोधवचन आहे -**
**अखंड राखावे अनुसंधान ।येणे कर्म होईल सहज रामार्पण ॥**

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

**कांहीं नित्यनेमाविण ।अन्न खाय तो श्वान ॥ वांयां मनुष्यपण ।भार वाहे तो वृषभ ॥१॥ त्याचा होय भूमी भार ।नेणे यातीचा आचार ॥ जाला दावेदार ।भोगवी अघोर पितरांसि ॥ध्रु.॥ अखंड अशुभ वाणी ।खरें न बोले स्वप्नीं ॥ पापी तयाहुनी ।आणीक नाहीं दुसरा ॥२॥ पोट पोसी एकला ।भूतीं दया नाहीं ज्याला ॥ पाठीं लागे आल्या ।अतिताचे दाराशीं ॥३॥**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, २९ एप्रिल २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# बारसू प्रकल्प डोकी फोडून लादण्याचा प्रयत्न करु नका

## नाना पटोले : स्थानिकांची मते विचारात घेऊनच बारसू प्रकल्पाचा निर्णय घ्या

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** रत्नागिरी जिल्ह्यातील बारसु रिफायनरी प्रकल्पाला स्थानिकांचा मोठा विरोध असताना भाजपाप्रणित शिंदे सरकार हा प्रकल्प जबरदस्तीने लादण्याचा प्रयत्न करत आहे. प्रकल्पाला विरोध करणाऱ्यांवर पोलीस बळाचा वापर केला जात असून काँग्रेस पक्ष स्थानिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. सरकारने जनतेची डोकी फोडून, खोटे गुन्हे दाखल करून प्रकल्प रेटण्याचा प्रयत्न केला तर सरकारलाही जशास तसे उत्तर देऊ, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिला आहे.

यासंदर्भात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, राज्यातील शिंदे सरकार बारसू प्रकल्पासाठी स्थानिकांवर जबरदस्ती करत आहे. आंदोलकांना हुसकावून लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात पोलीस फौजफाटा तैनात केला आहे. आजही पोलिसांनी आंदोलकांवर बळाचा वापर केला. स्थानिकांना विश्वासात घेतल्याशिवाय बारसू रिफायनरी प्रकल्पाचा निर्णय सरकारने घेऊ नये अशी भूमिका काँग्रेस पक्षाची आहे. पण सरकार हुकूमशाही पद्धतीने वागत आहे. सरकार जर पोलीसांच्या बळावर प्रकल्पाला विरोध करणाऱ्या स्थानिकांवर अन्याय, अत्याचार करणार असेल तर खपवून घेतले जाणार नाही. रत्नागिरी जिल्ह्यात ज्या भागात बारसू रिफायनरीचा प्रकल्प प्रस्थावित



आहे तेथील शेकडो एकर जमीन परप्रांतीय व सरकारच्या जवळच्या लोकांना सरकारने कमी दरात मिळवून दिली आहे आणि आता तीच जमीन मनमानी दराने विकून पैसा कमवण्याचा उद्योग आहे. सरकारने काही लोकांच्या हितासाठी व दिल्लीच्या दबावाखाली निर्णय घेण्याचा प्रयत्न करु नये. आम्ही बारसू येथे जाऊन तिथल्या लोकांची मतं जाणून घेतली आहेत, तसेच समर्थक विरोधक, सर्व बाजूच्या लोकांशी सुद्धा चर्चा करुन त्यांची मतं जाणून घेतली आहेत. सरकार स्थानिकांशी, प्रकल्पाला विरोध असणाऱ्यांशी चर्चा का करत नाही ? चर्चेपासून सरकार पळ का काढत आहे ? असे प्रश्न विचारत सरकारने सामंजस्याची भूमिका घेऊन चर्चतून मार्ग काढावा.



## महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या पोलादपूर तालुका अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार बबन शेलार

आधुनिक केसरी न्यूज

**पोलादपूर :** महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या पोलादपूर तालुका पत्रकार संघाची बैठक रायगड जिल्हा अध्यक्ष ज्येष्ठ पत्रकार शैलेश पालकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवार, दि. २७ एप्रिल २०२३ रोजी आयोजित करण्यात आली. पोलादपूर शहरातील लोकसेवा संस्थेच्या कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीत पोलादपूर तालुका पत्रकार संघाची कार्यकारिणी निवड करण्यात आली. यावेळी कार्याध्यक्षपदी कोकण तक युट्यूब न्यूज चॅनलचे संपादक आमीर तारलेकर यांची निवड करण्यात आली. सचिव पदी प्रिती बुटाला तर सहसचिव पदी ऋताली पवार तर खजिनदार पदी योगेश भोसले यांची एकमताने निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्य म्हणून विश्वास नलावडे व श्रीकांत भिलारे हे कार्यरत राहणार आहेत. यावेळी रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश पालकर यांनी रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रकारांना महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाच्या माध्यमातून पत्रकारांचे नेते वसंत मुंडे डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या नेतृत्वाखाली एकत्र केल्यानंतर आता रायगड जिल्ह्यातील पत्रकारांना संघटीत करण्यासाठी मे महिन्याअखेरपर्यंत व्यापक प्रयत्न सुरू करणार असल्याचे यावेळी सांगितले. नवनिर्वाचित पोलादपूर तालुका अध्यक्ष बबन शेलार यांनी पोलादपूर तालुक्यातील पत्रकारांना तसेच नवोदितांना सोबत घेऊन पत्रकारितेची प्रतिष्ठा निर्माण करण्यासाठी आपण अनुभवाचा पुरेपूर वापर करून तालुक्यात नावलौकिक निर्माण करण्याची ग्वाही दिली.

## वादळी वाऱ्याने ट्रक उलटला; अभियंत्यासह दोघांचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

जळगावः तालुक्यातील चिंचोली गावानजीक गुरुवारी दुपारी वादळी वाऱ्यामुळे उभी असलेली मालमोटार उलटून त्याखाली दबून आडोशाला उभ्या असलेल्या अभियंत्यासह दोन जणांचा जागीच मृत्यू झाला. एक जण गंभीर आहे. चिंचोली गावानजीक नवीन जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सुरू आहे. बांधकामाचा ठेका पुणे येथील न्याती कन्स्ट्रक्शनला देण्यात आला आहे. बांधकामासाठी बिहारमधील काही मजूर आले आहेत. गुरुवारी दुपारी वादळी वारा वाहू लागल्याने वादळापासून जीव वाचविण्यासाठी मजुरांनी पत्र्याच्या शेडचा आसरा घेतला. वादळी वाऱ्याचा वेग अधिक असल्याने पत्र्याचे शेड उडाले. त्यामुळे शेडमधील मजूर तेथे उभ्या असलेल्या वाहनाच्या आडोशाला गेले. मात्र, वादळी वाऱ्याने वाहनही उलटले. त्याखाली भोला पटेल ( रा. सानिकावा, बिहार ) आणि चंद्रकांत वाभळे ( ५२, रा. चाळीसगाव, सध्या पुणे ) हे दाबले गेले. त्यात दोघांचा जागीच मृत्यू झाला, तर अफरोज आलम ( २३, रा. कुंडाळे, बिहार ) हा जखमी झाला. जखमीला जिल्हा शासकीय



वैद्यकीय महाविद्यालयाच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. क्रेनद्वारे वाहन बाजूला करुन दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. याबाबतची माहिती मिळताच एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. मृत भोला हा कंत्राटी पद्धतीने कामाला होता. गावातील काही मित्रांसोबत तो कामासाठी आला होता. त्याच्यामागे आई, वडील, भाऊ, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे. चंद्रकांत वाभळे हे अभियंता म्हणून न्याती कंपनीत नोकरीला होते. १५ दिवसांपासून ते वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीच्या कामासाठी आले होते.



## शिवसेनेच्या महिला पुणे शहर प्रमुखपदी पूजा रावेतकर

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या महिला आघाडीच्या पुणे शहर प्रमुखपदी पूजा रावेतकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पुढील एक वर्षांकरिता ही नियुक्ती असून, रावेतकर यांच्या नियुक्तीचे शिवसेनेचे सचिव संजय मोरे यांनी दिले आहे. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण याचा सक्रियपणे प्रचार व प्रसार करून शिवसेना पक्षाच्या वाढीसाठी सर्वांना सोबत घेऊन काम कराल, असे त्यांना दिलेल्या नियुक्तीपत्रात म्हटले आहे. मधुमालती आसरा फाउंडेशन आणि शिवसेना पक्षाच्या माध्यमातून रावेतकर महिलांनासाठी विविध उपक्रम राबवत असून, येणाऱ्या काळात महिला संघटन मजबूत करून महिला भगीनींच्या समस्या सोडवण्याचा, तसेच शासकीय योजनांच्या माध्यमातून महिलाना आत्मनिर्भर करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. रावेतकर यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



# यात्रेकरूंनो सावधान

आधुनिक केसरी

चारधाम यात्रेदरम्यान हवामान खात्याने उत्तराखंडमधील चार जिल्ह्यांना अलर्ट जारी केला आहे. हवामान खात्याने उत्तराखंडमधील जिल्ह्यांमध्ये पाच दिवस हिमस्खलनाचा इशारा दिला आहे. यासोबतच प्रशासनाला सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मध्य प्रदेश दिल्ली-एनसीआर, उत्तर प्रदेश, गुजरात आणि देशातील इतर राज्यांतून येणाऱ्या यात्रेकरूंना उत्तराखंडच्या हवामानाची माहिती घेऊनच प्रवास सुरू करण्याचे आवाहन केले गेले आहे. यमुनोत्रीमध्ये दिवसभर अधूनमधून बर्फवृष्टी सुरूच आहे. त्यातच गंगोत्रीच्या उंच शिखरांवर पुन्हा हिमवृष्टी आणि धाममध्ये पाऊस झाल्याची माहिती मिळते आहे. केदारनाथमध्ये जोरदार बर्फवृष्टी होत असल्याने रुद्रप्रयाग जिल्हा प्रशासनाने प्रवाशांना सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन केले आहे. धाम परिसरात पावसाची संततधार सुरूच असून, त्यामुळे तापमानातही घट झाली आहे. हिमल्खलनाच्या इशाऱ्यामुळे रस्त्यावरुन प्रवास करणे यात्रेकरुंसाठी धोकादायक ठरू शकते. या कारणास्तव, हवामान खात्याने नवीन इशारा जारी करताना प्रवाशांना जिथे आहात तिथेच थांबण्याचे आवाहन केले आहे. हवामानाची माहिती मिळाल्यानंतरच पुढील प्रवास करण्याचे सुचवले आहे. चारधाम यात्रेच्या सुरुवातीलाच, म्हणजेच मंगळवारीही हवामान खात्याने बर्फवृष्टी आणि हिमस्खलनाचा इशारा दिला होता. उत्तराखंडमध्ये बर्फवृष्टी आणि हिमस्खलनाचा इशारा दिल्यानंतर पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने सरकारने गोमुख ट्रॅकवर आठवडाभर बंदी घातली होती. यासोबतच सरकारही अलर्ट मोडवर आले आहे. उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात कोणत्याही पर्यटकाला साहसी खेळ किंवा ट्रेकिंग करू न देण्याचा निर्णय सरकारने घेतला होता. उत्तरकाशी जिल्ह्यात आणखी काही दिवस बर्फवृष्टी आणि हिमस्खलन होण्याचा इशारा देण्यात आला आहे. याच पार्श्वभमूीवर गंगोत्री राष्ट्रीय उद्यान प्रशासनाने उत्तरकाशीचा गोमुख ट्रेक पुढील एक आठवड्यासाठी बंद केला आहे. गंगोत्री राष्ट्रीय उद्यानाचे उपसंचालक रंगनाथ पांडे यांनी यासाठी आदेश जारी केले आहेत. जेव्हा हवामान अनुकूल असेल तेव्हाच पर्यटकांना गोमुखाकडे जाण्यास परवानगी दिली जाईल, असे आदेशात म्हटले आहे. विशेष म्हणजे बर्फवृष्टीमुळे चारधाम यात्रेला आलेल्या एकाही भाविकाला गोमुखात जाण्याची परवानगी देण्यात आलेली नाही.

# पारंपरिक बियाणे संवर्धनाची आव्हाने



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**मानवी शरीरावरील विविध क्लिनिकल चाचण्यांवरून हे स्पष्ट झाले आहे की आपल्या आरोग्यसेवासंबंधी आव्हाने सातत्याने वाढत आहेत. शरीराची रोगप्रतिकारक शक्ती सतत कमी होत आहे. यामागे अनेक कारणे आहेत. पण, सर्वात मोठे आणि मुख्य कारण म्हणजे अनैसर्गिक आणि कीटकनाशकांच्या मदतीने तयार होणारे अन्न. देशात राजकीय इच्छाशक्तीच्या अभावी शेतीच्या कामासाठी सुनियोजित कार्यक्रम आखले गेले नाहीत. परिणामी, अन्न उत्पादनाचा दृष्टीकोन विशिष्ट होण्याऐवजी सामान्य बनला. ग्रामीण आत्मनिर्भरतेच्या संकल्पनेला तडा जाऊ लागला.**

ग्रामीण लोक मोठ्या संख्येने शहरे आणि महानगरांमध्ये स्थलांतरित झाले. पण प्रत्येकाला अन्नाची गरज ही नैसर्गिक गरज आहे. त्यामुळे, या मोठ्या प्रमाणातल्या लोकसंख्येच्या शहरांमधील स्थलांतरामुळे सरकारला विविध मार्गांने पिकांचे उत्पादन वाढवणे भाग पडले. नैसर्गिक आणि सेंद्रिय पद्धतीने ताबडतोब आणि मोठ्या प्रमाणात उत्पादन वाढवण्यासाठी फायदेशीर वातावरण नसल्यामुळे पिकातील कीटकांचा नाश करून पिकातून जास्तीत जास्त अन्नधान्य निर्माण करण्याच्या उद्देशाने कीटकनाशकांचा वापर वाढू लागला. त्यामुळे उत्पन्न वाढले, अन्नधान्यही वाढले, परंतु अशा अन्नामुळे मानवी शरीरही रोगग्रस्त झाले. अर्थात ही प्रक्रिया तीन दशके जुनी आहे. आता कीटकनाशके बनवणाऱ्या बड्या कंपन्यांचा दबदबा वाढला आहे. केवळ भांडवली धोरणांमुळे पिकांसाठी कीटकनाशके तयार केली जात आहेत. नैसर्गिक शेती करण्याचा आणि लोकांचे आरोग्य सुधारण्याचा संकल्प केलेल्या लोकशाही संस्थांचे कीटकनाशक उत्पादक कंपन्यांवर प्रभावी नियंत्रण नाही. अनैसर्गिक शेती करणे ही प्रदीर्घ काळापासून व्यावहारिक प्रथा बनत गेली आहे.

पारंपारिक बियाणे संवर्धन, लागवड आणि सेंद्रिय स्वरूपात अन्नधान्य उत्पादनाचे उपक्रम भारतासारख्या देशात अत्यंत मर्यादित प्रमाणात केले जात आहेत. केवळ श्रीमंत लोकच या प्रकारची कृषी उत्पादने खरेदी करू शकतात. अशा परिस्थितीत कीटकनाशके मारलेल्या अन्नधान्याचे उत्पादन, वितरण आणि वापर वाढत आहे. याचा थेट परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. लोकांना विचित्र आजारांनी घेरले आहे. या आजारांच्या निदानासाठी त्वरित उपचार किंवा औषध उपलब्ध नाही. जगण्यासाठी आवश्यक असलेले अन्नधान्य शुद्ध आणि नैसर्गिक स्वरूपात नसताना सामान्य माणूस काय करू शकतो ? काहीच नाही. त्याला आर्थिकदृष्ट्या परवडणारेही नाही. या स्थितीत शेतीशी संबंधित नवीन धोरणे तयार करून त्यांची ठोस अंमलबजावणी करण्याची मोठी जबाबदारी सरकारवर आली आहे. सध्याच्या केंद्र सरकारने या दिशेने महत्त्वाची पावले उचलली असली, तरी त्याचे सकारात्मक आणि अपेक्षित परिणाम दिसून यायला बराच कालावधी लागणार आहे. अन्नधान्य शुद्ध असण्यासाठी बियाणे आणि खते त्याची ही पहिली गरज आहे. जीएम पद्धतीमुळे पिकांची बियाणे कमी उपयोगी व अधिक विकारग्रस्त झाले आहेत. जीएम म्हणजेच जेनेटिकली मॉडिफाइड. जे बियाणे अनुवांशिक स्वरूप, गुणवत्ता आणि परिणामाच्या दृष्टीने योग्य होते आणि ज्यात नैसर्गिक स्वरुपात कोणताही मोठा विकार नसतो, ते बियाणे अनुवांशिक अनैसर्गिक बदल (GM) प्रक्रियेतून गेल्यानंतर ते पौष्टिक, शक्तीहीन आणि विकृत बनत गेले. हे सगळे व्हायला अडीच ते तीन दशकांचा प्रदीर्घ काळ लोटला आहे. मात्र बियाण्यांच्या जनुकशास्त्र बदलण्याच्या या प्रक्रियेत मूळ, नैसर्गिक आणि जुन्या बियांचे संवर्धन झाले नाही. देशात काही सरकारी, निमशासकीय, महामंडळांच्या मदतीने बियाणे संरक्षणाच्या काही पद्धती विकसित केल्या जात आहेत, परंतु भारतातील संपूर्ण कृषी व्यवस्थेला नैसर्गिक शेतीच्या मार्गावर आणण्यासाठी त्या पुरेशा नाहीत. वास्तविक पारंपारिक बियाणे संवर्धनाच्या दिशेने प्रयत्न आणि कार्य केले पाहिजे जसे की सर्वोत्तम विक्री होणारे FMCG



म्हणजेच 'फास्ट मूव्हिंग कन्झ्युमर प्रॉडक्ट' बनवण्यापासून ते विक्रीपर्यंत. आणि मुख्य म्हणजे असे प्रयत्न आणि कृती सरकारच्या पातळीवर जास्त व्हायला हव्यात. तरच बियाणे संवर्धनातील आव्हानांना तोंड देता येईल.

भारत सरकारच्या कृषी सहकार व शेतकरी कल्याण विभागांतर्गत कार्यरत नॅशनल सीड कॉर्पोरेशन लिमिटेड या कामात गुंतलेली असली, तरीही बियाण्यांवर अनैसर्गिक प्रयोग करण्याची प्रवृत्ती नियंत्रणात नाही. आणि पारंपारिक बियाणांचे संवर्धन आणि साठवण हा उद्देश ग्राउंड लेव्हलला प्रभावीपणे साध्य होताना दिसत नाही. नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन लिमिटेड ही संपूर्णपणे भारत सरकारच्या मालकीची आहे. पारंपारिक आणि अस्सल बियाणे तयार करण्याच्या उद्देशाने 1963 मध्ये त्याची स्थापना करण्यात आली. महामंडळ सध्या त्यांच्या स्वतःच्या शेतात आणि देशभरातील 11,603 नोंदणीकृत बियाणे उत्पादकांमार्फत सुमारे 567 जातींच्या 78 पिकांच्या प्रमाणित बियाण्यांचे उत्पादन करत आहे. 2021-22 या आर्थिक वर्षात महामंडळाचा एकूण महसूल 915.72 कोटी रुपये होता. महामंडळाची अकरा क्षेत्रीय कार्यालये आहेत. 22,000 हेक्टर पाच शेती क्षेत्र आहेत. इतकेच नव्हे तर, त्याचे भारतभर अठ्ठेचाळीस प्रादेशिक कार्यालये/ उप-युनिट्स, तीस बियाणे उत्पादन केंद्रे, 107 विपणन केंद्रे, 76 बियाणे प्रक्रिया प्रकल्प, सात वातानुकूलित बियाणे साठवण सुविधा, दोन भाजीपाला बियाणे पॅकिंग केंद्रे आणि एक डीएनए फिंगर प्रिंटिंग प्रयोगशाळा आहे. भारत. अठ्ठेचाळीस प्रादेशिक कार्यालये/

उप-युनिट्स, तीस बियाणे उत्पादन केंद्रे, 107 विपणन केंद्रे, 76 बियाणे प्रक्रिया प्रकल्प, सात वातानुकूलित बियाणे साठवण सुविधा, दोन भाजीपाला बियाणे पॅकिंग केंद्रे आणि एक डीएनए फिंगर प्रिंटिंग प्रयोगशाळा आहे.
केवळ नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन लिमिटेडच नव्हे तर केंद्रीय कृषी मंत्रालयाव्यतिरिक्त राज्यांच्या कृषी विभागांनीही पिकांचे उत्पादन प्रत्येक दृष्टिकोनातून पोषक, दर्जेदार आणि आरोग्यदायी बनवण्यासाठी अनेक धोरणे तयार केली आहेत. मात्र धोरणांच्या अंमलबजावणीत गुंतलेली कार्यकारी यंत्रणा भ्रष्टाचारात गुंतलेली आहे. त्यामुळे अशा यंत्रणेच्या निष्काळजीपणाचा फायदा पिकाशी संबंधित कीटकनाशक कंपन्या घेतात. भाजीपाला, डाळी, तृणधान्ये, भरड धान्य, फळे एवढेच नव्हे तर मसाल्यांच्या उत्पादनातही नैसर्गिक ताकद उरलेली नाही. प्रत्येक प्रकारच्या उत्पादनातील नैसर्गिक पौष्टिकता, चव, गंध, रंग, इतर सर्व गुण संपले आहेत. उदाहरणार्थ, तांदळाच्या उपलब्ध बहुतेक जाती लांब स्वरूपाच्या, कोरड्या आणि पौष्टिक सार नसलेल्या आहेत. भातामध्ये सत्त्वच शिल्लक राहिलेले नाही. तांदळाचे पारंपारिक बियाणे पांढरे असते आणि त्यावर ललंगी धारी किंवा पट्टे असतात. पण आता ही भाताची जात अजिबातच दिसत नाही. तसेच इतर पिकांचे बियाणेदेखील पारंपारिक स्वरूपात टिकलेले नाही. सरकारला या दिशेने गंभीर आणि क्रांतिकारी धोरणे आखून त्यांची ठोस आणि सुरळीत अंमलबजावणी सुनिश्चित करावी लागेल. खेड्यापाड्यात शेतीची उपलब्धता न झाल्यामुळे, शेती अल्पभूधारकांपुरतीच मर्यादित राहिल्याने आणि जुन्या पिढीतील शेतकऱ्यांनी त्यांच्या नवीन पिढीकडे पारंपरिक बियाणे आधारित शेतीचे व्यावहारिक ज्ञान हस्तांतरित न केल्यामुळे तसेच अशा विविध कारणांमुळे,आज कृषी क्षेत्र पूर्णपणे बदलले असून त्याला आधुनिक आणि व्यावसायिक स्वरूप आले आहे.

या कारणास्तव, पारंपारिक बियाणे संवर्धनासाठी सरकारचे प्रयत्न निष्फळ ठरत आहेत. यावरून असे दिसते की नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन लिमिटेडच्या नेतृत्वाखाली पारंपारिक बियाणे संवर्धनाचे कागदी घोडे नाचवले जात आहेत, प्रत्यक्षात ग्राउंड लेव्हलला कामगिरी सुमार आहे. या अनुभवाच्या संदर्भात सांगायचे तर देशातील मोठ्या लोकसंख्येला सेंद्रिय आणि नैसर्गिक अन्नधान्याचा अन्नपुरवठा होऊ शकत नाही हे कटू सत्यही आहे.

याचे कारण असे की, पारंपारिक बियाणे संरक्षणाच्या प्रक्रियेनंतर देशात जे काही सेंद्रिय आणि नैसर्गिक उत्पादन तयार केले जाते, ते अधिक मूल्य मिळावे या हेतूने निर्यात केले जाते किंवा देशातील श्रीमंत वर्गच अशा उत्पादनांची खरेदी करू शकतो. परिणामी, देशातील मोठ्या लोकसंख्येला अनैसर्गिक, कृत्रिम आणि पौष्टिकतेची कमतरता असलेले अन्नधान्य खरेदी करून खावे लागते. प्रत्येक नागरिकाला पौष्टिक, नैसर्गिक, सेंद्रिय आणि भेसळविरहित अन्नधान्य अव्याहत मिळण्यासाठी पहिल्यांदा लोकसंख्या नियंत्रणात आणण्याची गरज आहे. देशाच्या लोकसंख्येवर नियंत्रण ठेवल्यास केवळ अन्नधान्याचा अपेक्षित पुरवठाच नाही तर अनेक सार्वजनिक गरजा आणि सुविधादेखील सहज उपलब्ध होतील.

# थोर शास्त्रज्ञ डॉ. शंकर आबाजी भिसे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र.: ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**स्वातंत्र्यपूर्व काळातील एक थोर संशोधक डॉ शंकर आबाजी भिसे यांचा जन्म २९ एप्रिल १८६७ रोजी मुंबईत झाला. म्हणजे आज २९ एप्रिल २०२० रोजी त्यांचे १५६ वे जयंतीवर्ष. या जयंतीचा विसर पडणाऱ्यांचीच संख्या अधिक असेल. ज्या काळात भारतीय नागरिकांना कमी लेखले जात होते त्या काळात डॉ भिसे यांनी संशोधन क्षेत्रात अजोड कार्य केले. लहानपणापासून संशोधनाची आवड असनाऱ्या डॉ भिसे यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी दगडी कोळश्यापासून गॅस शुद्ध करण्याचे पेटंट मिळवले.**

१८९७ मध्ये त्यांनी शास्त्रीय ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी सायंटिफिक क्लबची स्थापना केली. पुढील वर्षी त्यांनी याच क्लब तर्फे विविध कलासंग्रह नावाचे मासिक सुरू केले.त्यांनी तयार केलेल्या वजन मापन यंत्राच्या आराखड्याला इंग्लंडमध्ये पहिले बक्षीस मिळाले. विशेष म्हणजे या स्पर्धेत युरोप आणि अमेरिकेतील नामांकित संशोधक सहभागी झाले होते. सण १९०० मध्ये त्यांनी मुद्रणव्यवसायातील यंत्र सामग्रीचा अभ्यास केला व लायनो, मोनो इत्यादी यंत्राच्या रचना व कालमर्यादा यांचा अभ्यास करुन त्यांनी भिसे टाईप या यंत्राचा शोध लावला व त्याचे युरोपीय देश व अमेरिकेमध्ये पेटंट प्राप्त केले. या यंत्राच्या उत्पादनासाठीत्यांनी सर द टाटा- भिसे इन्व्हेन्शन सिंडिकेटची लंडन येथे स्थापना केली. इंग्लंडमध्ये गेल्यावर त्यांनी छपाईच्या क्षेत्रात अनेक शोध लावले. त्यांनी गुणिका मातृका नावाचे दर मिनिटास १ हजार २०० विविध प्रकारचे खिळे पडणारे यंत्र १९१४ मध्ये तयार केले, १९१६ मध्ये विक्रीसही काढले. त्याचवर्षी ते अमेरिकेत गेले व तिथे त्यांनी युनिव्हर्सल टाईप मशीन या कंपनीच्या विनंतीनुसार आयडियल टाईप कास्टर हे यंत्र शोधून काढले व त्यांचे पेटंटही मिळवले. १९२१ मध्ये त्यांनी हे यंत्र विक्रीस काढले. १९१७ मध्ये त्यांनी शेला नावाचे कपडे धुण्यासाठी वापरता येईल अशी डिटर्जंट पावडर तयार केली व त्याच्या निर्मितीचे हक्क एका ब्रिटिश कंपनीला दिले. त्यांनी शोध लावलेल्या ऑटोमेडियन या गुणकारी औषधामुळे पहिल्या महायुद्धात अनेक सैनिकांचे प्राण वाचले. डॉ भिसे यांच्या साठाव्या वाढदिवशी इंग्लंडमध्ये त्यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

या सुमारास त्यांची महान शास्त्रज्ञ थॉमस अल्वा एडिसन यांच्याशी भेट झाली. एडिसन यांनीही त्यांच्या संशोधनकार्याचा गौरव केला. डॉ भिसे इंग्लंडमध्ये असताना इंग्लंडचे आफ्रिकेशी युद्ध सुरू झाले. यावेळी स्वयंचलित तोफ काढण्याची विनंती तेथील कारखानदारांनी भिसे यांना केली, पण आपले संशोधन हे विश्वाच्या कल्याणासाठी असून आपल्या संशोधनातून विश्वाचा संहार होऊ नये, अशी त्यांची भूमिका होती. म्हणूनच त्यांनी इंग्लंडमधील कारखानदारांनी ही मागणी नम्रतापूर्वक नाकारली. डॉ भिसे यांच्या मानवतावादी भूमिकेमुळे त्यावेळी अनेकांचे प्राण वाचले. डॉ भिसे यांनी सुमारे २०० शोध लावले. त्यांचे कार्य सर्वांसाठी कायम प्रेरणादायी आहे. अमेरिकेत न्यूयॉर्क येथे ७ एप्रिल १९३५ रोजी या महान संशोधकांचे निधन झाले. संशोधन क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान अतुलनीय आहे. शासनाने त्यांच्या या महान कार्याची दखल घेऊन त्यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करावा.



हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# राजुर येथे आर्ट ऑफ लिव्हिंगचे आनंद अनुभूती शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** अध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या प्रेरणेतून आणि आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून भोकरदन तालुक्यातील श्रीक्षेत्र राजूर येथे आनंद अनुभूती शिबिर नुकतेच संपन्न झाले असून या शिबिरात राजुरसह परिसरातील विविध गावातील शिबिरार्थी सहभागी झाले होते. शिबिराच्या माध्यमातून साधकांनी आनंदी जीवन जगण्याचा अनुभव घेतला. श्रीक्षेत्र राजुर येथे २५ ते २८ एप्रिल दरम्यान सकाळी ५ ते ८ या दरम्यान गणपत दादा विद्यालयाच्या प्रांगणात हॅपिनेस प्रोग्रामचे आयोजन करण्यात आले होते.त्या अनुषंगाने आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक राहुल जोशी यांनी पूर्णवेळ उपस्थित राहून शिबिरार्थींना मार्गदर्शन केले व आर्ट ऑफ लिव्हिंगच्या विविध कोर्सची माहिती करून दिली. आनंद अनुभूती शिबिराच्या माध्यमातून सूक्ष्म व्यायाम, सूर्यनमस्कार, शारीरिक व बौद्धिक खेळ, योग, प्राणायाम, ध्यान, उज्जयी श्वसन, भस्त्रिका, सुदर्शन क्रिया यासारख्या योगीक क्रिया शिबिरार्थीकडून करून घेण्यात आल्या. शिबिराच्या समारोपीय सत्रामध्ये प्रशिक्षक राहुल जोशी म्हणाले की सुदर्शन क्रियामुळे शरीर, मन निरोगी राहते. नकारात्मक भाव नष्ट होतो.माणूस वर्तमानात जगायला शकतो.त्यामुळे सुखी व आनंदमय जीवनाची अनुभूती येते. आनंद अनुभुती शिबिरातून माणसाचे व्यक्तिमत्व खुलून कार्यक्षमतेत वाढ होत असल्याचे मत जोशी यांनी व्यक्त केले. या शिबिरात ज्ञानेश्वर पुंगळे, शिवाजी बांदल, बाळासाहेब बोराडे, उद्धव फुंदे, जीवन घुगे, समाधान माळी, महेश देशमुख, गणेश दारूवाले, सदाशिव दारूवाले, भगवान सुद्रिक, अक्षयकुमार, जयस्वाल, सचिन तायडे, संदीप होळे, रवी चेके, सचिन तायडे, विश्वंभर वानखेडे, नंदू तायडे आदी साधकांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रम यशस्वीत्यासाठी उद्धव फुंदेसह अनेकांनी परिश्रम घेतले. शेवटी कार्यक्रमाचे आभार शिवाजी बांदल यांनी मानले.



# CSMSS दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाला 'राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद' (NAAC) B+ मूल्यांकन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** कांचनवाडी, छत्रपती संभाजीनगर येथील छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था संचलित दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाला अत्यंत प्रतिष्ठेचे मानले जाणारे "राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद" (NAAC) B+ मूल्यांकन अधिस्वीकृती मिळाली आहे.NAAC म्हणजे National Assessment and Accreditation Council ज्याला मराठी भाषेमध्ये 'राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद' असे म्हणतात. राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषद ही संस्थानांच्या गुणवत्ता दर्जाला समजण्यासाठी महाविद्यालय, विश्वविद्यालय आणि इतर मान्यताप्राप्त विद्यालय त्यांच्या उच्च स्तरावरील शिक्षण मूल्यांकन आणि मान्यताची व्यवस्था करते. NAAC शैक्षणिक प्रक्रियांचे आणि त्यांच्या परिणामांचे अनुसंधान, सुविधा आर्थिक सुदृढता आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधाच्या संबंधित संस्थांच्या कार्यासंबंधी गुणवत्तेसाठी शैक्षणिक संस्थांना मूल्यांकन करत असते. या मूल्यांकन पद्धतीत महाविद्यालयाच्या वर्गखोल्या (डिजिटल क्लासरूम ), शैक्षणिक गुणवत्ता, उपलब्ध साधनसामग्री, विविध मूल्यांकन मॉडेल्समधील मुद्दे, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील तरतुदी आदी विविध मुद्यांचा समावेश केलेला होता. या सर्व मुद्द्यांचे मुद्देनिहाय मूल्यांकन करून सापेक्ष प्रतवारी प्रणाली (रिलेटिव्ह ग्रेडिंग सिस्टम ) करून बी प्लस (B+) (CGPA 2.55 ) मूल्यांकन प्राप्त झाले आहे. दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या विश्वासार्ह सार्थ सेवेला मिळालेली ही पोचपावती असून भविष्यात अधिकाधिक चांगल्या सुविधा, शैक्षणिक गुणवत्ता देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, अशी ग्वाही छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. रणजीत मुळे यांनी दिली. शैक्षणिक गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देऊन आर्थिक सुदृढता आणि विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध सुविधा अधिक दर्जेदार करून विश्वासार्ह ओळख निर्माण केली असून 'नॅक' अधिस्वीकृती मुळे आपल्या सर्वांची जबाबदारी अधिक वाढली असून सांघिक प्रयत्नातून ती निश्चितच पूर्ण करू, असा विश्वास संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख यांनी दिली. 'नॅक' अधिस्वीकृतीमुळे महाविद्यालयाकडून दिल्या जात असलेल्या गुणवत्तापूर्ण व विश्वासार्ह शैक्षणिक दर्जावर शिक्कामोर्तब झाले आहे, या पुढील काळात विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा आमचा प्रयत्न राहील, असे दंत महाविद्यालय आणि रुग्णालय अधिष्ठाता डॉ. लता काळे यांनी व्यक्त केले. यावेळी कृषी महाविद्यालय संचालक डॉ. दत्तात्रय शेळके, अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, तंत्रनिकेतन महाविद्यालय प्राचार्य डॉ. गणेश डोंगरे, मानव संसाधन अधिकारी श्री. अशोक आहेर, जनसंपर्क अधिकारी श्री. संजय अंबादास पाटील, दंत महाविद्यालय शैक्षणिक प्रमुख डॉ. संजय सरोदे आदी उपस्थित होते.



CSMSS दंत महाविद्यालयाच्या ' B+ ' हा ' ग्रेड मिळाला असून महाविद्यालयाचा CGPA 2 .55 एवढा आला आहे . या मानांकनामुळे अनेक फायदे होणार असून शहरातील नामांकित आणि नॅक दर्जाप्राप्त आमचे महाविद्यालय असल्याने विद्यार्थ्यांना करिअर आणि उच्च शिक्षणासाठी निश्चितचं फायदा होईल . CSMSS दंत महाविद्यालय आणि रुग्णालयाच्या आमच्या सहकाऱ्यांनी केलेल्या अथक प्रयत्न आणि परिश्रमाचे हे यश असल्याचे त्यांनी सांगितले . **पद्माकरराव मुळे, सचिव, छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्था**

# वांबोरीत उद्या रंगणार वांबोरी कला महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधत महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला वांबोरी (ता.राहुरी) येथे दुसरा वांबोरी कला महोत्सव होणार असल्याची माहिती स्वागताध्यक्ष डॉ.योगेश पानसरे यांनी दिली.महोत्सवाचे उद्घाटन वांबोरी गावचे सरपंच किरण ससाणे यांच्या हस्ते होणार असून या कार्यक्रमासाठी ह.भ.प ईश्वर महाराज (शास्त्री),कविवर्य नागेश शेलार व झी हास्यसम्राट फेम राजीव सुरवसे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पत्रकार बाळासाहेब कांबळे यांच्या हस्ते अनुराधा प्रकाशनच्या ग्रंथदालनाचे उद्घाटन होणार असून प्रश्नमंजुषा हा विशेष कार्यक्रम प्रा.डॉ.विशाल तिडके संयोजित करणार आहेत.वृक्षविद्यार्थी सन्मान व पुस्तक वाटप समारंभ देखील यावेळी होणार आहे.तसेच मान्यवरांच्या हस्ते वांबोरीचे सुपुत्र हरहुन्नरी कलावंत आशिष निनगुरकर यांच्या 'उजेडाच्या वाटा' या लेखसंग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. भानुदास सावळेराम व्यवहारे यांच्या स्मरणार्थ व वांबोरी साहित्य मित्र मंडळाच्या वतीने आयोजित वांबोरीत महाराष्ट्र बॅंकेसमोरच्या पटांगणात होणाऱ्या या कला व प्रबोधन महोत्सवात गावातील विविध क्षेत्रांत उत्तुंग काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन विशेष सन्मान केला जाणार आहे. गडचिरोलीचे डी.वाय.एस.पी. संदीप भांड,राहत्याचे गटविकास अधिकारी समर्थ शेवाळे,सामाजिक कार्यकर्त्या अचला झंवर,सामाजिक व आध्यात्मिक उपक्रम राबवणारे अशोक व्यास,उत्तम ज्येष्ठ शिक्षक विद्याधर कोटस्थाने,प्रगतिशील यशस्वी शेतकरी देविदास जवरे व दिलीप जवरे आदींना मान्यवरांच्या हस्ते वांबोरीभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

गावातील अनेक विद्यार्थ्यांना आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ दिले जाणार असून त्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम देखील मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. वांबोरी कला व प्रबोधन महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी वांबोरी कला अकादमीचे संतोष महापुडे,प्रा.डॉ.विशाल तिडके,डॉ. योगेश पानसरे,आदिनाथ मोरे,निवृत्ती पाटील,रोहिदास ससाणे,अप्पासाहेब पागिरे,नासिर कोतवाल,स्वरूप कासार,इंद्रजित पाटील,विशाल दाते व प्रतिक कोरडे आदी कार्यरत आहेत.दुसऱ्या दिवशी महाराष्ट्रदिनी माजी सैनिकांचा सन्मान समारंभ देखील होणार आहे. भरगच्च कार्यक्रमाची रेलचेल असणाऱ्या या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन स्वागताध्यक्ष डॉ.योगेश पानसरे यांनी केले आहे.

# झाडावर वीज कोसळून बैल ठार; जवखेडा खुर्द येथील घटना

आधुनिक केसरी न्यूज

**राजूर :** शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास अचानक आलेल्या अवकाळी पावसामुळे भोकरदन तालुक्यातील जवखेडा खुर्द येथे झाडावर वीज कोसळून शेतकऱ्याच्या एका बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे ६० हजार रुपयाचा बैल आणि ४०हजार रुपयांची बैलगाडी असे एकूण एक लाखांचे आर्थिक नुकसान झाल्याचे शेकऱ्याचे म्हणणे आहे. शासनाने या घटनेचा तात्काळ पंचनामा करून आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्याकडून केली जात आहे. जवखेडा खुर्द येथील दादाराव आप्पासाहेब दानवे या शेतकऱ्याने गट क्रमांक २०१ मधील आपल्या शेतामध्ये बाभळीच्या झाडाच्या सावलीत बैलाची जोडी बांधली होती. परंतु दुपारी तीनच्या च्या सुमारास वातावरणात अचानक बदल होऊन चक्रीवादळासह ढगांचा गडगडाट आणि विजांचा कडकडाट सुरू झाला. काही क्षणातच बाभळीच्या झाडावर जोरात वीज कडाडली.आणि त्यातच शेतकऱ्याच्या एका बैलाचा जागीच मृत्यू झाला आहे.दरम्यान बाभळीच्या झाडावर वीज कोसळल्याने झाडही मुळासकट उन्मळून पडले आहे.

**तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी :** मी एक अल्पभूधारक शेतकरी आहे .शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास माझ्या शेतात गट क्रमांक२०१ मध्ये वीज पडून बैल ठार झाला आहे . तसेच बैलगाडीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे . बैल नसल्याने शेतीची मशागत आणि खरिपाची पेरणी कशी करावी हा मोठा प्रश्न आहे .या नसर्गिक आपत्तीमुळे बैल आणि बैलगाडी असे दोन्ही मिळून एक लाखाचे आर्थिक नुकसान झाले आहे . संबंधित विभागाने घडलेल्या घटनाचा पंचनामा करून तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी .
**दादाराव आप्पासाहेब दानवे, नुकसानग्रस्त शेतकरी**

महाराष्ट्र Business Katta












# बरी नव्हे दादा: ओव्हरटेकची बाधा



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**"हम भी किसीसे कम नही!" हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून "सदैव सैनिका पुढेच जायचे!" या तोऱ्यात तो मिरवत फिरतो.**

आज प्रत्येकाच्या मुखातून हे शब्द बाहेर पडताना दिसतात, की सद्याचे युग हे स्पर्धेचे युग आहे. म्हणूनच की काय? आजचा युवकवर्ग पुढच्यास ओलांडून त्याच्या कितीतरी पुढे निघून जाण्याच्या नादात- ओव्हर टेक करण्याच्या प्रयत्नात सदासर्वकाळ दिसून येतो. यातच तो आनंद मानतो, हेच आपले ध्येय समजतो. मग तो जीवनमार्ग असू द्या किंवा वर्दळीचा राष्ट्रीयमार्ग तथा आंतरराष्ट्रीय महामार्ग असू द्या. आपलाच एक बांधव आहे, आपल्यासारखाच एक मानव आहे, अशी कदाचित त्याला कल्पना किंवा बुद्धीच उमगत नसावी. असे ते ओव्हर टेकचे भयान नाट्य बघून वाटते. बरं, एकाने ओव्हर टेक केले, म्हणून दुसरा तरी शांत व आपल्या चालीने- वेगाने मार्गक्रमण असतो का? नाही. त्याला पण चेव येतो, त्याची तीव्रपणे चेतना जागृत होते. मग तो चिडून त्वेषाने इरेस पेटतो आणि आपणही त्याला मागे पाडावे, म्हणून तो गाडी अतिवेगान दामटू लागतो. कारण "हम भी किसीसे कम नही!" हाच त्याचा स्वाभिमानी हेका असतो, तोरा असतो. परंतु त्याला हे कळत नाही, कि जाऊ दे बिचाऱ्याला! तो अंत्यत तातडीच्या कामात असेल. त्या ओव्हर टेकरची गाडी अधिक बलशाही व नवीन, कोरी करकरीत असेल. जाऊया आपण आपल्या नित्य चालीने. ओव्हर टेकरला मात्र ही सवय नित्याचीच होऊन जडलेली असते. कुठल्याच कामात तो मागे राहू इच्छित नाही. यातून त्यास खुप मोठा आनंद मिळत असावा, मात्र तो क्षणिक आणि आसुरी आनंद असतो. तो शाश्वत आनंद, ब्रह्मानंद मुळीच नसतो, हे मात्र नक्की! असेही त्याला वाटते, की आपण फार मोठे पराक्रमी वीर आहोत, म्हणून सदैव सैनिका पुढेच जायचे! या तोऱ्यात तो मिरवत फिरतो.

ज्ञानवंतांनी भुकेल्या, तहानलेल्या, अधाशी, हपापलेल्या व्यक्तीस पुढ्यात घेऊन त्याची इच्छा पूर्ण केली पाहिजे. त्याच्यासारखेच ज्ञानवंतही करू लागले तर त्यांच्यातील फरकच कळणार नाही. म्हणून ज्ञानवंतांनी संयम, सबुरी व धीरानेच अशा प्रसंगाना सामोरे जाणे इष्ट ठरते. एकदा एका बाइकस्वाराने ओव्हर टेक केला. तेव्हा मागे पडलेला बाइकस्वार त्वेषाने पेटून उठला व बाइक वेगात दामटली. अतिवेगामुळे वळणावर ती घसरली आणि रस्त्याच्या कडेला असलेल्या दगडावर जोरात आपटली. तिचा चेंदामेंदा झाला, तर बाइकस्वाराने मात्र या जगाचा कायमचा निरोप घेतला. दुसरी एक घटना अशी, की चार चाकी कारला एका बाइकस्वार युवकाने ओव्हर टेक करून मागे टाकले आणि तो शहरातील मुख्य चौकात येऊन काहीतरी खरेदी करू लागला. तेवढ्यात ती कार येऊन पोहोचली. कारचालक युवती त्याला आडवी झाली. "मला ओव्हर टेक करण्याची तुझी हिंमतच कशी झाली?" म्हणत आधी त्याच्या गालांगालावर मोजले आणि मग त्याला चांगलेच बदडून काढले. असा आपल्याला ओव्हर टेक केल्याचा वचपा, बदला घेतला. किती मोठ्ठा आनंद, परमानंद झाला असेल तिला! नाही काहो? तरीही बिच्चारा युवक शांतच! अनेकदा असेही पाहिले आहे, की ओव्हर टेकर समोरून येणाऱ्या बसला धडकून अपघात घडला आणि बसमधील १०-१५ निरपराध निष्पाप जीव मृत्यूच्या दाढेत शिरले. अशा या भानगडी विनाकारण जीवावर बेतत असतात. तरीही ओव्हर टेकर्संना यात काहीच कशी काय लाज-लज्जा-शरम वाटत नाही? ईश्वरप्राती करून ब्रह्मानंद प्राप्तीसाठी अशी तातडी, असे साधकांना ओव्हर टेक करणारे महाभाग मात्र क्वचितच दृष्टीस पडतात. कारण या आध्यात्मिक, भक्तिमार्गावर चालणारा लंगडालुळा होत नाही तर त्याचा थेट पुनर्जन्मच होतो, एक खरा भला माणूस म्हणूनच!

समजा, आपली एखादी मूल्यवान वस्तू घरातच कुठेतरी हरवली. ती जोपर्यंत आपल्या दृष्टीस पडत नाही तोपर्यंत मनास चैन पडेल तर शप्पथ! ती शोधण्यासाठी आपण एका पाठोपाठ एक साधन वापरतो. कधी काठीने, कधी झाडूने ओढून, ढकलून



वा चाचपडून बघतो. तर कधी विजेरीचा प्रकाशझोत टाकून डोळे फाडफाडून पाहतो. ती वस्तू सांपडत नाही, तोवर शोध घेणे आपण थांबवित नाही. सहज एखादे सद्गृहस्थ यावे आणि वस्तू उचलून तुम्ही शोधत आहात ते हेच का? असे उच्चारताच आपली उत्सुकता शिगेला पोहोचते. झटकन ती वस्तू हातात घेऊन तिला निरखून बघतो आणि मोठ्या आनंदाने खड्या आवाज म्हणतो, "अहो, ती हीच माझी अमोलक वस्तू! मी हीलाच शोधत होतो." असे म्हणून आपण पूर्वीप्रमाणे ती वस्तू शोधत राहाल का? नाही. आधी त्या दात्या व्यक्तीस अनेक नमस्कार घालतो, धन्यवाद देऊन त्याचे स्तुतीपाठ गातो. आजीवन ऋणी व उपकृत राहण्याचे बोलून दाखवितो व वचनबद्ध होतो. आपण परत त्याच वस्तूचा शोध सुरूच ठेवला, तर लोक आपल्याला नक्कीच मूर्ख ठरवतील. मात्र त्या वस्तूची स्वच्छता, सुरक्षा, सुशोभन, कलाकुसर, काळजी आदी वेळोंवेळी चालवित असतो. अगदी असेच ब्रह्मानंद व इश्वरप्राप्तीस केल्या जाणाऱ्या भक्ती वा पुजापाठाचे आहे. विचारा, कसे? तर आपण पुजापाठ कशासाठी करतो? त्यामागील उद्देश साफ-स्पष्ट असावा लागतो. ईश्वरप्राप्ती करून ब्रह्मानंद मिळवावे, असा उद्देश असेल तर वरील दृष्टांत तंतोतंत लागू पडतो. त्यासाठीच आपण पुजापाठ, जप, तप, योगयाग करत असतो. परंतु अनेक शोधाशोधांती एखादा ब्रह्मवेत्ता सद्गुरू मिळाला आणि त्याने ब्रह्मदर्शन घडवून दिले. तर मग परत तसलेच पुजापाठ करत बसणे योग्य राहील का? नाही ना! म्हणून मग केवळ ईश्वरास आमरण प्रसन्न ठेवण्यासाठी सद्गुरूच्या आदेश व वचनांचे पालन करत त्यालाच आपण सदैव हसतमुख ठेवण्याचा प्रयत्न करतो. हे सर्वश्रूत आहे, हीच खऱ्या ब्रह्मानंदप्राप्त साधकांची परंपरा आहे. आपण जिथून सुरूवात केली होती, तिथे थांबून सांगावेसे वाटते, की ओव्हर टेक करणारास पुढे जाऊ द्या, पण मागे पडणाराने अजिबात चालाखी करू नये. पुढे जाणारास पुढ्यात घेऊन त्याच्या यशस्वीतेबद्दल सहकार्य द्यावे, यामुळे काय होईल? तर वाईट प्रसंग वा अप्रिय घटना अजिबात उद्भवणार नाही. वादंग वा हिंसाचाराला आपणच ब्रेक लावू शकाल, एवढे मात्र निश्चिंत! यात तुम्हाला जो आनंद मिळेल; तो खरोखरच ब्रह्मानंद असेल..!

# मानवी सौख्याचे सूक्त आळवणारी ऊर्जावान कविता : ऋतुगंध

आधुनिक केसरी

**'ऋतुगंध' हा देखणा कवितासंग्रह कवी सुभाष बागल यांच्या कवी म्हणून असलेल्या सामर्थ्याचा परिचय करून देतो. "ऋतुगंध घेऊन या दारात पहाट आली परसातल्या फुलांना हळूच जाग आली" अशी सलामी पहिल्याच कवितेत हा गंधवारा पिऊन घेतलेला जिंदादिल कवी करतो. गंधवारा प्राशन करणाऱ्या कवीला ऋतुगंध भावनारच. त्यांनी दोन-तीन कवितांना हेच शीर्षक दिलंय. पण प्रखर सामाजिक भान जपणारा हा कवी आहे. या कवीची वृत्ती काही मिळवण्याची नाही. कवीला अस्सल मराठवाडी बाज हवा. माणुसकीचा साज हवा! कवितेला तर मानवतेची मातृभाषा असेच म्हटले जाते.**

या कवीचा मूळ पिंड चिंतनाचा आहे. तेच त्या कवीचे सामर्थ्य आहे. अर्जुन पुढे, कृष्ण मागे नि आचार्य धृतराष्ट्राच्या भूमिकेत असे हे अधर्मयुद्ध आहे. कवीने या अधर्मयुद्धावरच जबर प्रहार केला आहे. कवी विशाल हृदयावर, उदार मनावर भाष्य करताना म्हणतो-

**"माणसांनी मात्र झापड बंद**
**करू नयेत**
**हृदय, इतर कुणासाठीही**
**मग ते माणसं असो वा प्राणी**
**तीच त्याची ओळख माणूस पणाची**
**तेथे दया, भूतदया आणि करुणा बुद्धाची"**

समस्त समाजाला मोठा संदेश कवीने दिला आहे. मनाने रोगी असलेल्या माणसाला काहीही चांगलं भागवत नाही.

जो दलितांना गळ्याची लावणाऱ्यात देवत्व पाहतो तो माणूस नितळ मनाचा, स्वच्छ हृदयाचाच असतो. लोकोद्धारासाठी, सामाजिक क्रांतीसाठी, घटनाकारासाठी कवीच्या मनात नितांत आदर आहे. म्हणूनच दीन- दुबळ्यांचं शोषण करणारे या मानवतावादी कवीला आवडत नाहीत.

'श्रावणातल्या सरी' या कवितेत कवीने शब्दवाद्याचा मुक्त निसर्ग शृंगार सजवला आहे. सुरुवातच वेधक आहे.

**"सळसळ अवखळ वीज नभातून, होई**
**वादळवारा- पाऊस पाणी निघे पैंजणसूर**
**उरातून, वाजे गाणे मंजुळ वाणी"** कविता कवीचे कर्म असते. जिवंतपणाची अनुभूती असते. जडतेला जोडणारा सृजनात्मक प्रयत्न असते कविता! कविता सर्वात चांगल्या माणसाचं सुंदर स्वप्न असते. कवितेतला शब्दांना अर्थ व्यापकता आलेली असते. कवितेतील शब्द अर्थसूचक असतात. डॉ. सुभाष बागल सरांना मी अनेक वर्षापासून ओळखतो. ते मानवोचित गुणांनी भरलेले जिंदादिल व्यक्तिमत्त्वाचे धनी आहेत. म्हणून त्यांची कविता ही अर्थप्रचूर कविता आहे. जेव्हा राब-राब राबणाऱ्या शेतकऱ्याचा मुलगा बौद्धिक परिश्रम करून अक्षरांच्या बागेतून कवितेचे पुष्प उगवतो तेव्हा त्याचं खुल्या मनाने अभिनंदन केलं पाहिजे असं मला वाटतं.

**"माझी कविता माझ्या अक्षरांचा गाव**
**माझी कविता माझ्या काळजाचा ठाव!"**

या ओळी कवीचं कवितेवरची उत्कट श्रद्धा दाखवतात. कवी कवितेवर व आईवर कविता लिहितोच. विद्रोही कवी तर ताल ठोक के म्हणतो-

" कविता-
**ममतेचा पंख**
**गरजेनेचा शंख**
**बंडाचा डंख असते!" ( ठिणगी)**

'प्रार्थना दयाघना' या कवितेत कष्टकऱ्याचं, अन्नदात्याचं अफाट दुःख पाहिलेल्या या संवेदनशील चिंतक कवीने त्यांच्या कल्याणासाठी सुखाची याचना केली आहे. 'संत तुकाराम' या कवितेत कवीचा तुकोबांवरील गाढा अभ्यास जाणवतो. तुकोबांना कर्मकांडाविरुद्ध रान उठवणारे आद्य विद्रोही कवी म्हटलं गेलंय,

**"तुका शब्दांचे आगर**
**तुका प्रेमाचा पाझर**
**तुका तत्वाचे भांडण**
**करी अधर्माचे कांडण**

या ओळी तुकोबांचे सार्थ वर्णन करतात.

एका कवितेत कवीने माणसांचे पोस्टमार्टम केलंय. माणसं दिसतात तशी नसतात. मुखवटेबाज माणसांना ओळखण्यात काही वेळेस गफलत होते. तरी हा विशाल हृदयाचा कवी मन जुळवण्याची, माणसं जोडण्याची आस ठेवतो.

आजच्या या स्वार्थांत समाजात डॉ. सुभाष बागल नावाचा बलदंड कवी शब्दांची मशाल घेऊन तमभंजन करायला निघाला आहे. त्याचा प्रवास अंधाराकडून प्रकाशाकडे जाणार आहे. तो समतेसाठी प्रकाशकिरणे घेऊन निघाला आहे.

**" असेल भाषा, प्रांत वेगळा, असेल वेगळा वेश**
**आहोत आपण भाऊ सगळे, एक आपला देश"**

कवीची बालके ही सशक्त कविता महिला सशक्तीकरणाची नवी परिभाषा सृजित करते. 'गांधीजी-2023` व `बापू तुझे सलाम' या दोन कविता आशय संपृक्त आहेत. भारतात पुन्हा चक्कर मारली पाहिजे असं म्हणणारा कवी म्हणतो बापू जिथं आहे तिथंच व्यवस्थित रहा. तिथूनच गरीब भारताकडे डोळे उघडून पहा. अर्थात हा देश आता बापूंनी येण्यासारखा लायकीचा राहिला नाही हेच कवीने सुचविले आहे. 'बापू तुझे सलाम' या कवितेत देशासाठी हाल- अपयश भोगत संघर्ष करण्यासाठी जिवाला महात्मा गांधी हे नाव धारण करावं लागतं! बापू तुझे सलाम!!

या चिंतनधर्मी कवीच्या बऱ्याच कविता प्रबुद्ध मनाला आंदोलित करतात, चेतवतात, जागवतात हे या कवीचं वैशिष्ट्य आहे. यश आहे! माणसाचा विचार निर्धार ठांब असला पाहिजे. धरसोड वृत्ती घातक असते.

**"गाव आहे पण राव नाही**
**राव आहे पण गाव नाही**
**असून हे सगळं, मनामध्ये भाव नाही."**

कारण विचार ठाम नाही.

प्रा.भाष बागल यांची कविता मनाला समृद्ध करते. मूल्य विचार प्रदान करते.

**"मूल्यांच्या दिशेने चालावी सगळ्यांची वाट**
**उगवेल जीवनात सगळ्यांच्या सूर्य पहाट**
**संपून जाईल अंधार, उगवतील नवीन तारे**
**सारनाथच्या चक्रासारखे फिरावित चक्र सारे**
**त्या चक्राची असावीत मोजून चोवीस आरे!"**


शब्दांची आराधना उपासना करणाऱ्या कवीच मातीशी घट्ट नातं आहे कारण हा कवी मातीची मशागत करणाऱ्या जन्मदात्याचा श्रमधर्मी वारस आहे हा कवी म्हणतो माणसाने कसं पळसासारखं फुलत गेलं पाहिजे. निवडुंगासारखं लढत गेलं पाहिजे! फुलात जाणं आणि लढत जाणं हा जीवनाचा भाग बनला पाहिजे. माणसाने आपल्या माणुसकीचा परिचय देत आभालाएवढं झालं पाहिजे. म्हणून 'मातीशी नातं' ही या संग्रहातली सर्वात आशयघन कविता आहे असं मी मानतो. हा चिंतनधर्मी कवी जीवनावर, जगण्यावर फारच मौलिक भाष्य करतो. त्यामुळे त्याच्या कवितेचा स्तर उंचावतो. कवी म्हणतो-

**" असावे जगणे ओलिताच्या शेतीसारखे**
**टरारून यावे जीवन, जगणे व्हावे**
**फुलासारखे!"**

'कवीची कविता त्याच्या मनाने मारलेली व्याकुळ हाक असते!' असं पाब्लो नेरुदा म्हणाला होता. हा कवीही माँ जिजाऊ, सावित्रीमाई, संत तुकाराम, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, गांधीजी अशा महापुरुषांना कवितेच्या डोलीतून मिरवत समाजाला व्याकूळ हात देत समजुतीच्या गोष्टी सांगतो. या कलाकृतीला डॉ. साहेब खंदारे यांची प्रस्तावना लाभली आहे. ब्लर्ब सम्राट कविवर्य फ. मुं. यांची पाठराखण छान आहे! मानवी सौख्याचे सूक्त आळवणाऱ्या या कवितेचं जोरदार स्वागत होईल याची मला खात्री वाटते. जीवनभर अंकुरत राहण्याचा महासंदेश देणाऱ्या या कवीच्या अ-क्षर वाटचालीस मनापासून शुभेच्छा!

'ऋतुगंध'
**बी. डी. जगत्पुरिया**
**'संगर', पाण्याच्या टाकीजवळ**
**मीरानगर, पडेगाव,**
**छत्रपती संभाजीनगर,**
**9860485398**

**कवी सुभाष बागल**
**सौरव प्रकाशन,**
**छत्रपती संभाजीनगर**
**मार्च -२०२३**
**पृष्ठे - १००**
**किंमत -१२०**



# धीरेंद्र शास्त्रींनी घृणास्पद टिप्पणीची माफी मागावी



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**धीरेद्र शास्त्रींनी हे लक्षात ठेवा भगवान सहस्त्रार्जुन महाराजांचे आम्ही वंशज आहोत त्यामुळे ते आमचे दैवत आहे. याकरीता त्यांच्याबद्दल कोणतेही अपशब्द समाज व वंशज सहन करणार नाही. त्यामुळे आपण भगवान सहस्त्रार्जुन बदल बोललेल्या शब्दाला विराम देऊन समाजाला जाहीर माफी मागावी.आम्ही भगवान राम, भगवान परशुराम, भगवान विष्णू, भगवान दत्तात्रेय या संपूर्ण देवीदेवतांना मानतो आणि पुजा अर्चाना करतो. परंतु आमचे वंशज आमचे दैवत असल्याने त्यांच्या बद्दल अपशब्द कलार समाज कदापी सहन करणार नाही ही बाब पं.धीरेंद्र शास्त्रीने लक्षात ठेवली पाहिजे. धीरेंद्र शास्त्रीने स्वतःला हिंदु धर्माचे सर्वेसर्वा समजून हिंदू धर्मात फुट पाडु नये.**

आम्ही सहस्त्रार्जुन महाराजांचे वंशज आहोत.कलार,कलाल, कलवार, कल्चुरी समाज संपूर्ण भारतात करोडोंच्या संख्येने आहे आणि हा समाज भगवान सहस्त्रार्जुन महाराजांना आपले दैवत मानते.अशा परीस्थितीत धीरेद्र शास्त्रींनी सहस्त्रार्जुन महाराजांना कुकर्मी, बलात्कारी, ब्राह्मण विरोधी, अत्याचारी असे घृणास्पद अपशब्द बोलून समाजातील लोकांच्या भावना दुखावल्या आहेत व सहस्त्रार्जुन महाराजांचा घोर अपमान केला आहे.त्यामुळे धीरेंद्र शास्त्रींनी सहस्त्रार्जुन महाराजांच्या वंशजांच्या संपूर्ण समाजाला खुली माफी मागावी.धीरेंद्र शास्त्रींनी हेही लक्षात ठेवले पाहिजे की कर्ण,रावण, कुंभकर्ण इत्यादींचा रामाच्या व अर्जुनाच्या हातांनी मृत्यू झाला.याचा अर्थ हा नाही की ते पापी होते.कर्ण शुरवीर होते,रावण महाग्यानी होते.परंतु या पृथ्वीतलावर येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचा मृत्यू अटळ आहे.त्यामुळे धीरेंद्र शास्त्रींनी ब्राह्मण विरुद्ध क्षत्रिय वंशज असा व्देष पसरवू नये.धीरेंद्र शास्त्री म्हणतात की हैहैवंशाचे राजांसाठी भगवान परशुरामाने फरशा उचलला.ही बाब चुकीची व खोटी आहे भगवान परशुरामाने अन्याय,अत्याचाराच्या विरोधात फरशा उचलला ही बाब धीरेंद्र शास्त्रींनी लक्षात ठेवली पाहिजे.कार्तवीर्याजुन यांनी आपल्या आराधनेच्या माध्यमातून भगवान दत्तात्रेय यांना प्रसन्न केले.त्यामुळे भगवान दत्तात्रेय यांनी युध्दाच्या वेळी कार्तवीर्यार्जुन यांना हजार हाताचे बळ प्राप्त करण्याचे वरदान दिले.त्यामुळे त्यांना सहस्त्रार्जुन संबोधल्या जावु लागले.यांनाच सहस्त्रबाहु अर्जुन सुध्दा म्हणतात. भगवान विष्णु आणि माता लक्ष्मी यांच्या सोबतच सहस्त्रार्जुन यांच्या कथेचे वर्णन भागवत पुराणमध्ये पहायला मिळते. देवतांच्या अनेक अवताराप्रमाणे सहस्त्रार्जुन महाराज हे भगवान विष्णूचे 24 वे अवतार माणल्या जाते. सहस्त्रार्जुन महाराज यांच्या नावाने सुध्दा पुराण व संग्रह दिसून येते.भारतातील संपुर्ण कलार, कलाल,कलवार, कलचुरी समाज स्वतःला सहस्त्रार्जुन महाराजांचे वंशज मानतात.त्यामुळे कलार, कलाल, कलवार, कलचुरी समाज अनेक राज्यांमध्ये सहस्त्रार्जुन महाराजांची जयंती कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला दिपोत्सवाप्रमाणे मोठ्या थाटाने व उत्साहाने साजरी करून पुजा-अर्चना करतात. मध्यप्रदेशमध्ये सहस्त्रार्जुन जयंतीला सार्वजनिक सुट्टी सुध्दा असते. सहस्त्रार्जुन ( सहस्त्रबाहु ) हे दानी,विद्वान,महाग्याणी, महापराक्रमी, महान योध्दा आणि कर्तव्य निष्ठावान राजा होते.पौराणीक ग्रंथ व पुराणांनुसार कार्तवीर्य अर्जुन( सहस्त्रार्जुन ) यांना हैह्याधिपति, दषग्रीविजयी, सुदशेन, चक्रावतार सप्तद्रवीपाधि, कृतवीर्यनंदन, राजेश्वर इत्यादी अनेक नाव असल्याचे पुराणांमध्ये वर्णन आहे.सहस्त्रार्जुन यांनी आपल्या



जिवनात अनेक युद्ध लढलेत. परंतु यात रावणासोबत युद्ध महाकाय युद्ध मानल्या जाते. सहस्त्रार्जुन यांनी भगवान विष्णूची कठोर तपश्चर्या करून 10 वरदान प्राप्त केले व चक्रवर्ती सम्राट ही उपाधी धारण केली.नर्मदा नदीच्या काठावर सहस्त्रार्जुन व लंकापती रावण यांच्यात घनघोर महाकाय युद्ध झाले.रावण जेव्हा सहस्त्रार्जुन सोबत युद्ध करायला पोहचले तेव्हा सहस्त्रार्जुने आपल्या हजार हातांच्या बळावर नर्मदा नदीच्या वेगवान प्रवाहाला रोखले.नंतर नर्मदा नदीचे पाणी एकठ्ठा करून पाणी सोडले, ज्यामध्ये रावणासह संपूर्ण सेना नर्मदा नदीच्या वेगवान प्रवाहामध्ये वाहुन गेली.या युद्धात रावणाचा पराजय झाला व रावणाला बंदी करण्यात आले. नंतर रावणाचे वडील महर्षि पुलत्स्य यांच्या मध्यस्थिने रावणाला सोडण्यात आले.सहस्त्रार्जुन यांचा समाजासाठी त्याग दानशुरपणा लौकिक आहे. धीरेंद्र शास्त्रींनी देश सेवा करावी व भ्रष्टाचाराच्या विरोधात मोहीम उभी करावी.परंतु हिंदु धर्मात फुट पाडण्याचे काम करू नये.आजही देशात महाभारत व रामायण कालीन वंशज आहेत मग काय यांना आपणं सर्वांना अत्याचारी म्हणावे काय ? त्यामुळे धीरेंद्र शास्त्रींजी आपल्या जिभेवर थोडा ताबा ठेवा आणि सर्वच वंशाच्या लोकांना सुखसमाधानाने राहु द्यावे. धीरेंद्र शास्त्रीजी आपण भगवान सहस्त्रार्जुन महाराजांबंद्दल केलेल्या घृणास्पद टिप्पणीचा जाहीर निषेध करतो. आपण जर स्वतःला खरोखरच देशभक्त समजत असाल तर भगवान सहस्त्रार्जुन महाराजांबंद्दल केलेल्या टिप्पणीची जाहीर माफी मागावी.कारण धीरेंद्र शास्त्रींना कोणत्याही देवीदेवतांबद्दल अपशब्द बोलण्याचा तिळमात्र अधिकार नाही हे लक्षात ठेवले पाहिजे.

# वृद्ध कलावंत मानधनासाठीच्या अर्जात शिथिलता असावी

## साहित्यिक धोंडोपंत मानवतकर यांचे मुख्यमंत्री साहेबांना पत्र

आधुनिक केसरी



महोदय,
उपरोक्त विषयास अनुसरून आपणास विनम्र निवेदन करण्यात येते की, महाराष्ट्र राज्यात अनेक कवी लेखक, साहित्यिक, शाहीर, कलावंत, प्रबोधनकार आहेत. ते महाराष्ट्र राज्याचाच नव्हे, तर भारताचा साहित्यिक व सांस्कृतिक वारसा जपतात व चालवतात. त्यामुळे सामाजिक स्वास्थ्य अबाधित राखण्यास मदत होते. जातीय सलोखा, धार्मिक सलोखा टिकवून ठेवण्यास फार मोठी मदत होते. यासाठी कलावंत रात्रंदिवस प्रयत्न करत असतात . त्यांचे हे योगदान अत्यंत मोलाचे आणि महत्वाचे आहे. याचा विचार करून अशा कलावंताची शासनाने कदर करावी व अशा महागाईच्या काळात त्यांना कमीत कमी ११ हजार रूपये एवढे मानधन दरमहा देण्यात यावे, जेणेकरून त्या दोघा पतीपत्नीचा उदरनिर्वाह बऱ्यापैकी होऊ शकेल !

आज अनेक वृध्द साहित्यिक, कलावंत हालाखीचे, उपेक्षित जीवन जगताहेत. काही कलावंतानी आपले संपूर्ण आयुष्य कला सादर करून प्रबोधन केले आहे व महाराष्ट्राची साहित्यिक, सांस्कृतिक परंपरा जपली आहे, आजही ते जपत आहेत; परंतु त्यांची परिस्तिथी अत्यंत वाईट आहे. काहींचा उदरनिर्वाह सुद्धा व्यवस्थीत होत नाही.

महाराष्ट्र राज्य सरकारने कवी, लेखक, साहित्यिक, कलावंत भारूडकार, गोंधळी, नाटककार, नाट्य कलावंत, अशा अनेक वृध्द कलावंतांचे सामाजिक प्रबोधनासाठी किंवा गावचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी केलेले कार्य लक्षात घ्यावे. अशा ५० वर्षावरील कलावंताचे सर्वेक्षण करण्याचे काम ग्राम पंचायत, नगर पंचायत, नगरपरिषद, महानगरपालिका यांचेकडे सोपवले जावे, त्यांच्याकडून या कलावंताचा बायोडाटा व त्यांच्या कार्याचा तपशील मागवावा. कारण वयोवृद्ध कलावंत अनेक कार्यालये फिरू शकत नाहीत किंवा सरकारचे जाचक नोटरीसारखे निकष पूर्ण करू शकत नाहीत. खरेतर एकाच आधारकार्डामध्ये रहिवासी व गांव पूर्ण पत्ता असतोच शिवाय त्या कलावंताची खरी जन्म तारीखही आधारकार्डवर असतेच म्हणून वेगळा जन्माचा दाखला, रहिवासी दाखला जोडण्याची अट निरर्थक वाटते. तालुका पातळीवर ग्रामीण रुगणालयाद्वारे वैद्यकीय अधिक्षकांनी दिलेले अपंगत्वाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जावे. हाडाच्या वयोवृद्ध कलावंताना ही सगळी कागदपत्रे गोळा करणे कठीण जाते. ह्या सगळ्या जाचक व कठीण प्रक्रियेतून कलावंत जाऊच शकत नाही. म्हणून शासनाकडे येणाऱ्या अर्जाची संख्या कमी किंवा नगण्य असते हे वास्तव सरकारने लक्षात घेतले पाहिजे. तालुक्यातील सर्व कलावंताची माहिती ग्रामपंचायतला असतेच. जिल्ह्यातील व शहरातील कवी, लेखक कलावंताची माहिती नगरपरिषद, नगरपालिकेच्या पदाधिकाऱ्याना असतेच, सरपंच, नगराध्यक्ष, महापौर यांच्या शिफारसीनुसार त्याच कार्यालयामार्फत कलावंताचा अर्ज भरून घ्यावा. यासाठी कोणत्याही संबंधित व्यक्तीने किंवा कार्यालयाने सदरहू कलावंताकडून कोणतेही शुल्क घेऊ नये. अशाप्रकारे कलावंताचा अर्ज व परिचय तसेच पंधरा ते वीस वर्षाच्या काळात त्याने केलेले कलेच्या क्षेत्रातील कार्य व त्याचा अनुभव, तपशील त्याबाबतचे कागदपत्रे घेऊन कलावंताची मानधनासाठी नोंदणी केली जावी व कलावंताना मानधन मिळावे. माननीय मुख्यमंत्री साहेब व कला संचालकांनी कलावंताना देण्यात येणारे मानधनासाठीचे नियम व निकष शिथील करण्याचा विचार करावा.

**आपला : डॉ.धोंडोपंत मानवतकर**
**एम.ए., पीएच्. डी. मराठी साहित्य.**
**कवी, लेखक, साहित्यिक, मंठा**
**अध्यक्ष -आविष्कार साहित्य, मंडळ,**
**मंठा, जिल्हा जालना, आविष्कार साहित्य मंडळ**
**स्थापना- १९९२**

# लोभापासून दूर रहायला हवे!

आधुनिक केसरी

आज माणुस लोभाच्या मागे धावताना दिसत आहे. माणुस आहे त्यात समाधानी नाही. अतिलोभापायी आपल्याला लाभ मिळेल .या आशेने हाती आलेली संधी देखिल तो गमावून बसतो. जो माणुस जीवनात संतुष्ट आहे तोच खरा सुखी, धनवान आहे. आयुष्यात सत्ता, संपत्ती, सौंदर्य यांच्या मागे न लागता. सत्ता, संपत्ती, सौंदर्य क्षणिक आहे. जी माणसे, आनंदाने,समाधानाने जगतात ती माणसे आज सुखी आहे.पशु पक्षी यांना भगवंताने चारा दिला आहे.मग भगवंत आपल्याला का नाही देणार आयुष्यात माणुस लोभापासुन दुर राहील्यास माणुस नक्कीच सुखी होईल.आपण या जगात सोबत काही घेऊन आलो नाही .आणी जाताना सुद्धा काही घेऊन जाणार नाही.धनदौलत ,सारं काही इथंच राहणार आहे.त्यामुळे लोभापासुन दुर राहण्यातच खरे हित आहे. लोभ हा माणसाचा शत्रू आहे. लोभी वृत्तीला काहीच अंत नसतो.लोभ हेच दुखाःचे मुळ कारण आहे.लोभ हा एक ना एक दिवस रसातळाला नेतोच . त्यासाठी लोभाला बाजुला ठेवा.लोभाच्या मागे धावत बसलो तर आयुष्याचे कल्याण होणार नाही.या जगात फुकटात काहीच मिळत नाही.लोभाच्या मागे लागुन दम लागतो.पण जीवनात लोभ काही सुटत नाही. मग हा लोभ कशासाठी आपण करायचा ज्यांच्याकडे संतोष , समाधान आहे अशीच माणसे लोभावर नियंत्रण ठेवू शकतात.लाभ उलटा शब्द केला तर भला असा होतो.लोभ सोडला तर भले तर होणारच आहे.यात काही शंका नाही. **संतोष दत्तू शिंदे, अहमदनगर, मो.७७२१०४५८४५**




# जय जय महाराष्ट्र माझा .... गर्जा महाराष्ट्र माझा ....!

आधुनिक केसरी

१ मे .. या दिवशी १९६० साली महाराष्ट्र या मराठी भाषिक राज्याची निर्मिती झाली . आज त्या घटनेला ६३ वर्षे झाली. हे राज्य होण्यासाठी कित्येकांनी आपल्या प्राणाची आहुती दिली. मुंबई मध्ये १०५ हुतात्मे बळी पडले. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आचार्य अत्रे, एस. एम. जोशी, काम्रेड डांगे, इत्यादी नेत्यांनी सारा महाराष्ट्र ढवळून काढला. मराठा या वृत्तपत्रातून आचार्य अत्रेंनी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ जोरात उभी केली. अखेर मराठी भाषिक राज्याचा मंगल कलश १ मे १९६० रोजी महाराष्ट्राला मिळाला. आजही बेळगाव व कर्नाटकातील सुमारे ८६५ मराठी भाषिक गावे यांचे महाराष्ट्रात विलीनीकरण झाले नाही. सध्या हा प्रश्न सुप्रीम कोर्टापुढे आहे महाराष्ट्र राज्य झाल्यानंतर त्याची धुरा मुख्यमंत्री या नात्यांने यशवंतराव चव्हाण यांनी घेतली सध्या एकनाथ शिंदे हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री आहेत महाराष्ट्र हे राज्य भारतात लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे .
मात्र क्षेत्रफळाच्या बाबतीत ते तिसऱ्या क्रमांकावर आहे महाराष्ट्राची लोकसंख्या ११ कोटी वर असून एकट्या मुंबई मध्ये एक कोटी ८० लाख लोक राहतात मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी असून नागपूर ही उपराजधानी आहे. मुंबई मध्ये देशातील विविध बँका तसेच विविध कार्यालये असून ते देशातील एक महत्वाचे आर्थिक केंद्र आहे महाराष्ट्राचा विस्तार ११८८०९ चौरस मैल असून दक्षिण दिशेला कर्नाटक, उत्तरेकडे गुजरात, व मध्य प्रदेश , तसेच पूर्वेकडे आंध्र प्रदेश ही राज्ये येतात . पश्चिम दिशेला अरबी सागर आहे . पश्चिम किनारपट्टीचा सागरी किनारा ७२० किलो मीटर आहे महाराष्ट्राचे एकूण कारभाराच्या सोयीसाठी पाच विभाग केलेले आहेत . त्यामध्ये पुणे , नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर हे ते पाच विभाग आहेत . जिल्ह्याची संख्या ३६ एवढी आहे . महाराष्ट्राची मातृभाषा मराठी असून ती बोलणारांची संख्या ६ कोटी २४ लाखाहून अधिक आहे साक्षरतेचे प्रमाण ८२. ९ टक्के एवढे आहे . स्त्री पुरुष जन्मदर पुरुष १०० तर स्त्रिया ९४६ असा आहे . महाराष्ट्र हे देशातील एक विकसनशील राज्य असून त्याला सांस्कृतिक परंपरा आहे संत ज्ञानेश्वर , संत तुकाराम , एकनाथ, गाडगेबाबा इत्यादी संत महाराष्ट्रात होऊन गेले आहेत अगदी प्राचीन काळापासून महाराष्ट्राची भूमी विख्यात आहे. ऋग्वेदामध्ये सुद्धा राष्ट्र म्हणून उल्लेख आहेत. महाराष्ट्रातील विविध स्थानाचा उल्लेख रामायण व महाभारतात आहेत . महाराष्ट्रा च्या उत्तरेस सातपुडा पर्वत तर पश्चिमेस सह्याद्रीच्या रांगा आहेत . देशाच्या औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचे प्रमाण १३ टक्के आहे . महाराष्ट्रातील सुमरे ६४. १४ टक्के एवढी लोकसंख्या कृषी व

शांताराम वाघ, पुणे

संबंधित उद्योगात आहे. देशात सर्वात जास्त धरणे महाराष्ट्रात असून मोठी धरणे १८२१ एवढी आहेत . किल्ले व गढ या बाबतीत महाराष्ट्र अतिशय समृद्ध आहे सुमारे ३५० पेक्षा जास्त किल्ले महाराष्ट्रात आहेत .देशात ही संख्या महाराष्ट्रात सर्वात जास्त आहे .अजिंठा वेरूळ येथील जगप्रसिद्ध वारसा लाभलेली लेणी, मुंबईचे जगप्रसिद्ध सीएसटी स्टेशन, पश्चिम महाराष्ट्रातील फुलांनी बहरलेले कास पठार, उल्केतून तयार झालेले लोणार सरोवर ही जागतिक वारसा स्थळे महाराष्ट्राचे भूषण आहे महाराष्ट्र हे देशातील शिक्षण व्यवस्थेत एका प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते कोळसा निर्मित व अणुऊर्जा निमित्त ऊर्जा क्षेत्रात महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर आहे . आज महाराष्ट्रात २० विद्यापीठे असून एक सेंट्रल विद्यापीठ आहे तसेच २१ डीम्ड विद्यापीठे आहेत महाराष्ट्र विधानसभेतील आमदारांची संख्या २८८ एवढी आहे खासदारांची संख्या ६७ आहे त्यामध्येलोकसभेचे ४८ व राज्यसभेचे १९ अशी संख्या आहे महाराष्ट्राचे लोकगीत म्हणून "

**जय जय महाराष्ट्र माझा ....**
**गर्जा महाराष्ट्र माझा ....!**

ह्या राजा बढे यांनी लिहलेल्या व श्रीनिवास खळे यांनी संगीत बद्ध केलेल्या व शाहीर साबळे यांनी गायलेल्या ह्या गीताला महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्र गीत म्हणून मान्यता दिली आहे.

आजही महाराष्ट्रासमोर अनेक आव्हाने उभी आहेत त्यामध्ये प्रादेशिक असमतोल, बेरोजगारी, दरवर्षी असणारा दुष्काळ, यावर पाणी आडवा पाणी जिरवा ही मोहिम तसेच शेततळी ही मोहीम सरकारतफे काम करत आहे. पावसाळ्यातील पडणारा थेम्ब अन थेम्ब अडवून शेतीला पाणी पुरवठा केल्यास महाराष्ट्रातील दुष्काळाचे चित्र पालटेल . वास्तविक देशात सगळ्यात जलसंधारण केंद्रे महाराष्ट्रात आहेत तथापि आजही अनेक भागात पाण्याची त्यांची भासते अजूनही मराठी भाषा ही अभिजात भाषेच्या सर्व अटी पूर्ण करूनही अद्याप पर्यटन मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला नाही कोरोनाचे संकट साऱ्या देशावर व महाराष्ट्रावर मोठे होते आत्ता कोठे परिस्थती पूर्वपदावर येऊ लागली आहे.

महाराष्ट्राच्या सर्वच क्षेत्रात प्रगती होवो व देशात महाराष्ट्र हे प्रथम क्रमांकाचे प्रगतीशिल राज्य गणले जावो तसेच कोरोना नष्ट होवो. महाराषट्राबरोबर देशही प्रगती पथावर जावो हीच महाराष्ट्र दिनी लाखो जनांची अपेक्षा.

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



श्री भद्रा मारोती छत्रपती संभाजीनगर

जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, छत्रपती संभाजीनगर मो : 9422201977

सौजन्य : इंटरनॅशनल स्पोर्टस,
2, सरस्वती संकूल, सिटी बँकजवळ, एस.बी. बसस्टँडसमोर, निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर. मो. 9673538888



# देवळाण्यात गिरीजा नदीवर पूल उभारा

## आ. सतीश चव्हाण यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील देवळाणा येथून गिरीजा नदी वाहते. नदीच्या पलीकडे जिल्हा परिषदेची पहिली ते सातवीपर्यंत मराठी आणि उर्दू माध्यमाची शाळा आहे. मात्र, दोन वर्षांपूर्वी झालेल्या अतिपावसामुळे या ठिकाणी असलेल्या नदीवरील पूल वाहून गेल्याने विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. त्यामुळे या ठिकाणी त्वरित पूल उभारावा, अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय यांच्याकडे केली आहे.

आमदार सतीश चव्हाण यांनी मंगळवारी देवळाणा या ठिकाणी सदिच्छा भेट दिली होती. या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे गंगापूर खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे अध्यक्ष महेश उबाळे, तालुकाध्यक्ष अनिल चव्हाण, चेअरमन अयूब पठाण, सरपंच नईमभाई, जुबेरलाला, वैभव चव्हाण आदींची उपस्थिती होती. या वेळी आमदार सतीश चव्हाण यांनी ग्रामस्थांच्या अडीअडचणी समजून घेतल्या होत्या. त्या वेळी या ठिकाणी असलेल्या गिरीजा नदीवर तातडीने पुलाची गरज असल्याचे ग्रामस्थांनी आमदार सतीश चव्हाण यांच्या निदर्शनास आणून दिले. आमदार सतीश चव्हाण यांनी सदरील मागणी लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांना या संदर्भात देवळाणा येथील वाहून गेलेल्या पुलाची दुरुस्ती करावी किंवा या ठिकाणी नवा पूल उभारण्यात यावा अशी मागणी देवळाणा गामस्थांकडून वारंवार होत आहे. पावसाळ्यात देवळाणा गावातील विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी रस्ताच नसल्याने जवळपास सहा महिने शाळा गावातील मंदिर, मशिदीमध्ये भरावी लागत आहे. ही बाब नक्कीच भूषणावह नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी निवेदनात म्हटले आहे. शाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकास होतो. अनेक जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांकरिता मूलभूत शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. देवळाणा गावातील विद्यार्थी या शैक्षणिक सोयींपासून वंचित राहत आहेत, असेही निवेदनात नमूद केले आहे. यी अडचण लक्षात घेता देवळाणा येथील गिरीजा नदीवर त्वरीत पूलाचे बांधकाम करावे अशी मागणी चव्हाण यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली.

# सुंदर माझा दवाखाना उपक्रमात कनकशीळ बाजारसावंगीची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या सुंदर माझा दवाखाना या उपक्रमांतर्गत उत्कृष्टरित्या दवाखाना व परिसर यांची स्वच्छता करून आरोग्य व्यवस्था अबाधित ठेवणाऱ्या आरोग्यवर्धिनी केंद्र कनकशिळ आणि प्राथमिक आरोग्य केंद्र बाजार सावंगी यांची निवड प्राथमिक पातळीवर उत्कृष्ट कामासाठी करण्यात आली, त्यामुळे आरोग्य विभागातर्फे परीक्षक म्हणुन कन्नड तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय मुळे यांनी या दोन्ही आरोग्य केंद्रांची तपासणी करून गुणांकन केले, तसेच आरोग्य केंद्रातर्फे राबवत असलेल्या सुंदर माझा दवाखाना या उपक्रमाचे कौतुक करून काही सूचनाही करण्यात आल्या. यावेळी कन्नड तालुका आरोग्य अधिकारी डॉ.संजय मुळे, वैद्यकीय अधिकारी डॉ.निलोफर अंजुम, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ.रमेश शेळके, आरोग्य सहाय्यक श्री सुनील जाधव, एल एच व्ही किरण डेहाणकर, बी सी एम ज्ञानेश्वर हारदे, आरोग्य सेवक अशोक अहिरे, आरोग्य सेविका ज्योती चिमणे, सीता माहुरे श्रीमती व्ही आर चौधरी, श्रीमती धुमाळ, दीपक पाडळे व श्री सुनील लहाने, गट प्रवर्तक भागूबाई जाधव यांची उपस्थिती होती.




# दिव्यांग व्यक्तीस आपुलकी प्रतिष्ठानकडून तीनचाकी सायकल भेट; मुलींचा शैक्षणिक खर्चही करणार!

आधुनिक केसरी न्यूज

**सांगोला :** आपुलकी प्रतिष्ठानकडून आलेगाव ता. सांगोला येथील कुमार गडहिंरे या दिव्यांग व्यक्तीस वैभव कुमार आलदर ऍडिशनल प्रायव्हेट सेक्रेटरी, रेल्वे राज्य मंत्री दिल्ली, यांच्याहस्ते तीनचाकी सायकल भेट देण्यात आली. त्याचबरोबर त्यांच्या दोन्ही मुलींचा आगामी वर्षाचा शैक्षणिक खर्च उचलण्याचा निर्णय आपुलकीने घेतला आहे.

घरची परिस्थिती बिकट, त्यात स्वतः दिव्यांग. पत्नी, दोन मुलींचा सांभाळ करण्यासाठी घराबाहेर पडावेच लागते. दिव्यांग असल्यामुळे जुन्या तीन चाकी सायकलवर भटकंती करायची. पाठीमागून ही सायकल कधी पत्नीने ढकलायची तर कधी मुलीने ढकलायची आणि मग आलेगाव ते सांगोला, जवळा, घेरडी अशा विविध ठिकाणी प्रवास करायचा आणि लोक जे काही देतील त्यात समाधान मानून आपला प्रपंच चालवायचा अशा या दिव्यांग कुमार महादेव गडहिरे यास आपुलकी प्रतिष्ठानने तीनचाकी सायकल देऊन त्याचा प्रवास आणखी थोडा सुखकर करण्यास हातभार लावला आहे. दिव्यांग असलेल्या कुमार गडहिंरे यास शासनाच्या योजनेतून काही रक्कम मिळते परंतु ती तुटपुंजी व वेळेवर मिळत नसल्याने प्रपंच चालविणे अवघड असल्याचे सांगून दहावी व आठवी च्या परीक्षा दिलेल्या दोन्ही मुलींना गावातीलच शाळेत शिक्षण देण्याचे अवघड काम समाजातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्यातून सुरु आहे. भल्या पहाटे घराबाहेर पडून बाजार भरणारे गाव गाठून किंवा सांगोला शहरात येऊन लोकांना मागून, लोक देतील त्यातून प्रपंच सुरु असल्याचे गडहिंरे यांनी सांगितले. सध्याची तीनचाकी सायकल खूपच जुनी झाल्याने दुसरी सायकल कुणीतरी द्यावी अशी इच्छा त्यांनी व्यक्त केल्यानंतर आपुलकी प्रतिष्ठान, सांगोला यांच्या वतीने त्यांना तीन चाकी सायकल भेट म्हणून देण्यात आली. त्याचबरोबर त्यांच्या दोन्ही मुलींच्या आगामी शैक्षणिक वर्षाचा खर्चही आपुलकी उचलणार असल्याचे अध्यक्ष राजेंद्र यादव यांनी सांगितले. यावेळी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, रमेशअण्णा देशपांडे, अरविंद केदार, महादेव दिवटे, प्रमोद दौंडे, अण्णासाहेब मदने, दादा खडतरे, प्रसन्न कदम, शिवदास राऊत, संजय काशीद पाटील, जे. एन. टकले, पिंटू ( संभाजी ) पाटील, अमर कुलकर्णी, काझी गुरुजी, बापूसाहेब ठोकळे, अजित बनसोडे आदी उपस्थित होते.



# दिव्यांग तपासणी व कृत्रिम अवयव शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** शहरात राधाकृष्ण मंगल कार्यालय ग्रीन पार्क 2 येथे स्वर्गीय आयोध्याबाई रामनारायणजी तोष्णीवाल चॅरिटेबल ट्रस्ट "राम- अयोध्या" येलदरी रोड जिंतूर द्वारा राम नारायणजी तोष्णीवाल यांचे पंचम पुण्य स्मरण प्रित्यर्थ जिंतूर शहरात दिनांक 29 एप्रिल 2023 रोजी जन्म जात अपंग साठी निशुल्क तपासणी करून ऑपरेशनसाठी योग्य वेळेस उदयपूर येथे ऑपरेशनसाठी पाठवण्यात येणार असून अपघातात आलेली अपंगत्व किंवा अंगवेडी वाकडे त्यासाठी शिबिरात कृत्रिम अवयवासाठी रजिस्ट्रेशन केल्या जाणार असून सर्व दिवांगांनी शिबिरात येण्यासाठी आधार कार्ड झेरॉक्स, अपंगत्व दिसेल असे 2 फोटो व अपंग प्रमाणपत्र सोबत आणावे. शिबिरात जास्तीत जास्त दिव्यांग स्त्री-पुरुषांनी उपस्थित राहावे असे आव्हान ब्रिज गोपाल तोष्णीवाल, गोविंदप्रसाद तोष्णीवाल, रमण तोष्णीवाल यांनी केले असून या शिबिरासाठी रजिस्ट्रेशन करण्यासाठी गजानन घुगे, श्रीपाद तळणीकर, गजानन तिखे यांच्याशी संपर्क करावा अशीही आव्हान करण्यात आले आहे.

# अरविंद रमेश प्रभू यांची आंतरराष्ट्रीय पिकल्बॉल फेडरेशनच्या अध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समिती विलेपार्ले संचालित प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुलाचे अध्यक्ष श्री अरविंद रमेश प्रभू यांची आंतरराष्ट्रीय पिकलबॉल फेडरेशनचे पुढील अध्यक्ष म्हणून निवड झाली आहे ज्याचे नाव यापुढे आंतरराष्ट्रीय पिकलबॉल फेडरेशन ( IPF ) असेल. खात्री आहे की क्रीडा क्षेत्रातील यांचा विपुल अनुभव आयपीएफला पिकलबॉलसाठी एकमेव प्रभावी जागतिक प्रशासकीय संस्था म्हणून घेऊन जाईल.

# लोहराच्या जंगलात वाघाच्या हल्ल्यात सुरक्षा रक्षक ठार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** चंद्रपूर – मुल मार्गावर ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या बफर झोन अंतर्गत येणाऱ्या लोहराच्या जंगलात पट्टेदार वाघाच्या हल्ल्यात पुरुषोत्तम बोपचे ( ४० ) हा इसम ठार झाला. ही घटना शुक्रवारी सकाळी ९.३० वाजता उघडकीस आली. इंदिरा नगर येथील रहिवासी असलेला पुरुषोत्तम स्थानिक एम ई एल पोलाद कारखान्यात सुरक्षा रक्षक म्हणून कार्यरत होता. सकाळी पुरुषोत्तम वन फुले वेचण्यासाठी लोहारा जंगलात गेला होता. दुपार झाली तरी घरी परत आला नाही म्हणून पत्नीने घरा शेजारी असलेल्या पतीच्या मित्रासोबत शोध घेतला. यावेळी जंगलात येऊन बघितले असता त्याचा मृतदेह मिळाला. घटनेची माहिती मिळताच वन व पोलिस विभागाचे अधिकारी घटनास्थळी पोहोचले.

# कडूगोड आठवणीच्या हिंदोळ्यावरील आत्मकथन



अरविंद भराडे

आधुनिक केसरी

**माजी प्राचार्य डॉ. ज्ञा. द. चापोलीकर यांचे 'आठवणीच्या हिंदोळ्यावर' या आत्मकथनाचे आज डॉ. प्रदीप आगलावे यांच्या हस्ते प्रकाशन होत आहे. त्या निमित्त या आत्मकथनाची ओळख करून देणारे हे टिपण.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याचा परिणाम म्हणजे १९६० नंतर विशेषतः महाराष्ट्रात आणि त्यानंतर देशभरातील शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात मोठी क्रांती घडली. त्यांना शिक्षणाची संधी मिळाली. त्यामुळे या समाजातील सुशिक्षित झालेल्या पिढीने आपण भोगलेल्या सुखदुःखांना साहित्याच्या रूपाने रूपाने वाट मोकळी करून दिली आहे. त्यात कथा, कविता, नाटक आणि कादंबरीबरोबरच आंबेडकरी विचारांच्या आत्मकथनाचे योगदान महत्त्वाचे आहे. आंबेडकरी विचारांची आत्मकथने भूत, वर्तमान आणि भविष्याचा वेध घेणारी असतात. भूतकाळातील व्यथा वेदनांना संघर्षमयरीत्या सामोरे जात आपले भवितव्य उज्वल करण्याचा प्रयत्न आंबेडकरी विचार आणि प्रेरणेमुळे आत्मभान आलेल्या व्यक्ती सातत्याने करत असतात. शिक्षणामुळे आपल्या जीवनात झालेला आमूलाग्र बदल हा आंबेडकरी आत्मकथनाचा केंद्रबिंदू मानायला हवा. माजी प्राचार्य डॉ. ज्ञा. द. चापोलीकर यांचे 'आठवणीच्या हिंदोळ्यावर' हे आत्मकथन या अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. लातूर जिल्ह्यातील चापोली या गावात अनुसूचित जातीत जन्मलेला ज्ञानदेव ते प्राचार्य डॉ. डी. डी. चापोलीकर हा संघर्षमय जीवनप्रवास म्हणजे 'आठवणीच्या हिंदोळ्यावर' हे आत्मकथन होय. डॉ. डी. डी. चापोलीकर यांनी बालपणी जातिव्यवस्थेची चटके सोसले. पण बुद्धाचा अत्त दीप भव मार्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा क्रांती विचार हे त्यांची प्रेरणा बनली. त्यामुळे त्यांना शिक्षणाच्या अनिवार ओढ लागली. त्यातूनच त्यांच्या जीवनाचा कायापालट झाला.

निजाम राजवटीमुळे मराठवाड्यातील अनुसूचित जातींच्या लोकांना दुहेरी शोषणाला सामोरे जावे लागत होते. एक म्हणजे उच्चवर्णीय आणि दुसरे म्हणजे निजामाचे रजाकार. या दोन्हीही वर्गाकडून अनुसूचित जातीवर अन्याय अत्याचार होऊन त्यांचे प्रचंड शोषण होत होते. भीतीची एक टांगती तलवार त्यांच्या मनावर कायम होती. "हैदराबाद राज्यांमध्ये निजाम सरकारची जनतेवर अन्याय अत्याचार वाढत होते रझाकार हे गावाची लुटालुट मानवी हत्या सर्रास करीत असत. रझाकार गावात आल्याचे चाहू लागताच भीतीपोटी आम्ही शेतामध्ये ज्वारीच्या पिकामध्ये लपवून बसत. आई-वडील व सर्व घरातील माणसे दाराला कुलूप लावून शेताकडे पळत जाऊन लपत असत." हे वर्णन बोलके आहे. चापोलीकरांना माध्यमिक शिक्षणासाठी चाकूरला यावे लागले. चाकूरमध्ये लिंगायत समाजाची संख्या जास्त. त्यामुळे त्यांना भाड्याने खोली मिळत नव्हती. शेवटी त्यांना मांगवाड्यात खोली शोधावी लागली. बँडवाल्याच्या गवत आणि तुरटीने बांधलेल्या झोपडीत राहावे लागले.




गावातील सरकारी विहिरीत पाणी भरण्यास त्यांना मज्जाव करण्यात आला. मात्र या गोष्टींना त्यांनी जुमानले नाही. त्यांच्यात ही बंडखोरी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारामुळे आलेली होती. दहावी ते पदवी पर्यंतचे शिक्षण त्यांना लातूर आणि सोलापूर यातील वसतिगृहात घ्यावे लागले. पदव्युत्तर शिक्षणासाठी चापोलीकर तत्कालीन मराठवाडा विद्यापीठात आले. अर्थशास्त्र विषयाचे एम.ए. झाले. कंधारच्या शिवाजी महाविद्यालयात त्यांना अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून नोकरी मिळाली. या ठिकाणी त्यांना साहित्यिक प्रा. झुंबरलाल कांबळे प्रा. प्र. ई. सोनकांबळे यांचा सहवास लाभला. चार वर्षे या ठिकाणी नोकरी केल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या मिलिंद कला महाविद्यालयात रीतसर मुलाखत देऊन ते रुजू झाले. 'मिलिंद'मध्ये त्यांच्या कर्तृत्वाला आणखीनच बहर आला. त्यांना प्राचार्य म. भी. चिटणीस, बी.एच. वराळे या दिग्गजांचे प्रोत्साहन आणि सहकार्य मिळाले. डॉ. चापोलीकर यांनी 'मिलिंद'चे उपप्राचार्य पद भूषवले. या काळात त्यांनी अनेक उपक्रम राबवले. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या आणि महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासाला खूप मोठा हातभार लागला. विद्यापीठाच्या आणि महाविद्यालयाच्या अनेक समित्यांवर त्यांनी काम केले. तब्बल ३२ वर्षांच्या सेवेनंतर ते निवृत्त झाले. मात्र सेवानिवृत्तीनंतरही त्यांच्यातला प्राध्यापक स्वस्थ बसला नाही. पुढे धानोरा येथील कला पाण्याचे विज्ञान महाविद्यालयाच्या प्राचार्य पदाची धुरा त्यांनी यशस्वीरीत्या सांभाळली. हे महाविद्यालय नावारुपाला आणण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले.

चाकोलीकर यांनी या आत्मकथनात आपल्या वडिलांपासूनच्या आर्थिक स्थितीची, व्यवसायाची, नातेवाईकांची, स्वतःच्या विवाहाची, पत्नीची, मुलींच्या शिक्षणासह सर्व आठवणी हृद्य स्वरूपात नोंदवल्या आहेत. सुमारे पाऊणशे वर्षांचा पट म्हणजे 'आठवणीच्या हिंदोळ्यावर' हे आत्मकथन आहे. तत्कालीन सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची स्थिती यातून चित्रित झाली आहे. चापोलीकरांच्या लेखनशैलीत बोलीभाषेतील जिवंतपणाचा अभाव असला तरी साध्या सरळ भाषेतील अभिव्यक्ती लक्षवेधक आहे. अनुभवातील प्रांजळपणाही महत्वाचा.

**'आठवणीच्या हिंदोळ्यावर'**
**लेखक : डॉ. ज्ञा. द. चापोलीकर**
**प्रकाशक : एज्युकेशनल पब्लिशर्स अँड डिस्ट्रिब्युटर्स, औरंगाबाद.**
**प्रथम आवृत्ती : १४ एप्रिल २०२३**
**किंमत : १५०/-**
**पृष्ठ : १४०**

# वादग्रस्त जमीन विकून लाखोंची फसवणूक

## धुळ्यात लँडमाफियाचा हैदोस : मोठ्या अधिकाऱ्यांचा हात असल्याचा संशय

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** नाशिक येथील मयूर शिवाजी जाधव व त्यांची पत्नी सीमा मयूर जाधव यांनी धुळे येथील दीपक शर्मा यांच्याकडून मौजे धुळे येथील सिटी सर्वे क्रमांक 495/2-4/ब-1 या क्षेत्रातील प्लॉट क्रमांक 25 विकत घेतलेला होता, त्यानंतर सदरचा प्लॉट राजेंद्र वालचंद शिंदे यांनी विकत घेण्यासाठी मयूर जाधव यांच्याकडून रीतसर सौदा पावती नोटरी केली, तसेच सदर प्लॉट खरेदी करण्यासाठी कागदपत्राची जमाव जमा करण्यासाठी प्लॉटचा सातबारा उतारा घेण्यासाठी संबंधित तलाठी कडे गेले असता, तलाठी यांनी उतारा दिला नाही तसेच सांगितले की, या प्लॉटचा उतारा तयार झालेला ही नाही त्यानंतर सिटी सर्वे कार्यालयात येथे कागदपत्राची मागणी केली असता त्यांनी सांगितले की या प्लॉटचा सातबारा उतारा आमच्या कार्यालयाला प्राप्त झालेला नाही, तत्कालीन सिटीसर्वे कार्यालयातील नगर भूमापन अधिकारी मुख्यलिपिक यांनी कागदपत्राची कोणतीही खातर जमा न करता सरळ नगर भूमापन क्रमांक देऊन मिळकत पत्रिका 2022 रोजी तयार केली आहे, त्यानंतर उपायुक्त धुळे महानगरपालिका, नगररचना अधिकारी व नगर मोजणी अधिकारी यांनी सुद्धा कोणतीही कागदपत्राची खात्री जमा न करता सरळ प्रकरणास मंजूर दिलेली आहे, शेत जमिनीचे मालक दीपक शर्मा यांनी सरकारकडे 65 हजार 340 चे चलन भरून जमा केलेले आहे, म्हणजेच यांनी फक्त एक हेक्टर 24 आर जमिनीचा बिनशेतीकडे वर्गा करण्यासाठी सरकारकडे भरणा केलेला आहे परंतु प्रत्येक पक्षात पाहता मंजूर क्षेत्र सुमारे अठरा हजार चौरस मीटर आहे, परंतु तहसीलदार यांनी कोणती खात्री कामा न करता अर्जदाराची जमीन ही प्रत्यक्ष 14000 चौरस मीटर पेक्षा कमी असताना ती 18 हजार चौरस मीटरची बिनशेतीकडे वर्ग करण्याची परवानगी दिलेली आहे म्हणजे तहसीलदार यांनी त्यांचा पदाचा गैरवापर करून चार हजार चौरस मीटर पेक्षा जास्त जमीन बिनशेतीकडे वर्ग केलेली आहे, दरम्यान दीपक शर्मा यांनी शासनाचे देखील फसवणूक केली आहे. या संदर्भात अर्जदार राजेंद्र वालचंद शिंदे यांनी शहर पोलीस स्टेशन येथे त्याच्या संदर्भात गुन्हा दाखल करण्यासंदर्भात तक्रार दिलेली आहे, परंतु पाच दिवस उलटूनही पोलीस प्रशासनाने कुठलीही कारवाई केलेली नाही म्हणून तात्काळ दीपक शर्मा व अन्य त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा व योग्य ती कारवाई करून आम्हाला न्याय मिळावा ही अशी पत्रकार परिषद येथे विनंती करण्यात आली आहे.

# वसुंधरा चषक क्रिकेट स्पर्धेत नगरपरिषदेचा दणदणीत विजय

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** स्वच्छ सर्वेक्षण २०२३ व माझी वसुंधरा 3.0 अभियान अंतर्गत अकलूज नगर परिषदेच्या वतीने जिल्हास्तरीय टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे दिनांक २३/४/२०२३ ते २४/४/०२३ रोजी आयोजन करण्यात आले होते याकरिता सोलापूर जिल्ह्यातून नगरपरिषद, नगरपंचायत च्या बारा संघाने भाग घेतला होता. यामध्ये पंढरपूर नगरपरिषद संघाने प्रथम फेरीमध्ये महाळूंग- श्रीपुर संघावर व क्वार्टर फायनलमध्ये मंगळवेढा संघावर व सेमी फायनल मध्ये बार्शी संघावर विजय मिळवला होता व अंतिम झालेल्या सामन्यामध्ये पंढरपूर विरुद्ध कुर्डुवाडी असा सामना झाला या मध्ये पंढरपूर संघाने प्रथम फलंदाजी करत सात षटकात एक बाद १४९ धावांचा डोंगर रचला यामध्ये नितीन मेहडा यांनी १०८ धावा काढल्या व शतक लगावले. १४९ धावांचा पाठलाग करताना कुर्डुवाडी संघाला सहा बाद 44 धावा पर्यंत मजल मारता आली. मुख्याधिकारी अरविंद माळी व उपमुख्याधिकारी सुनील वाळूजकर यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर नगरपरिषद क्रिकेट संघ. संघप्रमुख व कोच आरोग्याधिकारी नागनाथ तोडकर, कर्णधार महेश गोयल नितीन मेहडा, रवी दोडिया, नितीन मेहडा किरण सोलंकी, रजनीश गोयल, रोहित वाघेला पियुष गोयल, सुहास कदम, सुरेश सोलंकी, विकी दोडिया, जितेश वाघेला, श्याम अंबुरे, आनंद पाटोळे, शैलेश परमार, संघाकरीता आरोग्याधिकरी शरद वाघमारे, धनंजय वाघमारे, संतोष सर्वगोड, गुरु दोडिया ऋषी अधटराव, बाबुशा माळी यांचे सहकार्य लाभले .

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट

महावीर घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# स्त्रीमुक्ती चळवळ भरकटत आहे

## विदर्भ महिला साहित्य संमेलनात शोभा रोकडे यांचे मत

आधुनिक केसरी न्यूज

**अकोला :** एकविसाव्या शतकातील स्त्री साहित्यिकांनी आपला विकास साधला असला तरी १९७५ मध्ये सुरू झालेली स्त्री मुक्ती चळवळ आता दिशाहीनपणे भरकटत चालल्याची खंत विदर्भ महिला साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष डॉ. शोभा रोकडे यांनी व्यक्त केली. मलकापूर रोड, अकोला नगरीतील देविकामाई देशमुख प्राथमिक शाळेतील सभागृहात मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानने हे संमेलन आयोजित केले होते. पुरोगामी चळवळीत महाराष्ट्र नेहमीच आघाडीव राहिला असून आणि लेखिकांनी ही चळवळ अधिकाधिक बळकट केली असली तरी तिला आलेली मरगळ दूर करायला हवी, असेही त्या म्हणाल्या. या संमेलनाचे उद्घाटन आयुर्वेदाचार्य डॉ. मनीषा यमनसनवार यांच्या हस्ते करण्यात आले. या संमेलनात गोव्यातून पाच लेखिकांनी सहभाग घेतला.

महाराष्ट्र राज्य संघर्ष संघटनेचे प्रदेशाध्यक्ष व संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. विजय दुतोंडे यांच्यासह नागपूरच्या साहित्यिक विजय ब्राह्मणकर, किशोर बुटोले, शिक्षणाधिकारी सुचिता पाटेकर यांच्या उपस्थितीत हे संमेलन झाले. संमेलनाचे आयोजन विजयाताई मारोतकर यांनी केले. कवयित्री व संपादक देविकामाई देशमुख याही यावेळी उपस्थित होत्या. ग्रंथदिंडीनंतर दीप प्रज्वलनाने संमेलनाचे उद्घाटन झाले.

उषा भोपाळे, विजया ब्राह्मणकर, विजया कडू, वैशाली कुटुंबे, विजया मारोतकर, ज्योती ताम्हाणे यांची पुस्तके प्रकाशित करण्यात आली. राजेंद्र देशमुख यांनी लिहिलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. विजया मारोतकर यांचेही यावेळी भाषण झाले.




**वाचकांची दाद हा पुरस्कार : पौर्णिमा केरकर**
लोकसाहित्याच्या अभ्यासक प्रा. पोर्णिमा केरकर यांनी साहित्याच्या वाटेवरील अविस्मरणीय क्षण या परिसंवादात प्रमुख अतिथी म्हणून सहभागी झाल्या होत्या. आपल्याला अनुभव आल्याशिवाय व चिंतन केल्याशिवाय लेखन करू नये, असा सल्ला नवोदितांना त्यांनी दिला. साहित्यातील अविस्मरणीय क्षणाचे अनुभव त्यांनी कथन केले. वाचकांची दाद मिळणे हाच पुरस्कार असेही त्या म्हणाल्या.

मुले ही देशाची संपत्ती - चित्रा क्षीरसागर
यावेळी कप्पा मनातला - माझं आईपण या विषयावर परिसंवाद झाला. अतिथी म्हणून गोव्याच्या सौ. चित्रा प्रकाश क्षीरसागर उपस्थित होत्या. मुलांसाठी आई काय करते. आपली मुले हे देशाची संपत्ती असते. मुलांनी देशासाठी काय करावे याची शिकवण आईच देते, असे विवेचन त्यांनी केले. मुलांना वाढवताना आईने भान ठेवले पाहिजे, आई हाच मुलांचा आदर्श असतो, असेही त्यांनी सांगितले. या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी डॉ. संगीता जीवनकर, प्रणोदी कळंबकर, अंजली नालमवार, ज्योती ताम्हणे, माया दुबळे, जया दाणे, मंदा खंडारे यांनी सहभाग घेतला. सूत्रसंचालन कवित शिरभाते यांनी केले. आभार साधना काळबांडे यांनी मानले.

गोव्याला प्राचीन काव्यपरंपरा - बापट
कविसंमेलनाच्या प्रमुख अतिथी प्रिया कालिका बापट यांनी बा. भ. बोरकरांच्या कवितेचे विश्लेषण मृद्गंध या कविसंमेलात केले. गोमंतकीय कवितेची प्राचीन परंपरा कथन करून त्यांनी आपली कविता गेय पद्धतीने सादर केली. कविता गांभीर्याने लिहायला हवी. कवितेत दर्द असला पाहिजे असेही बापट म्हणाल्या. कविसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी माधुरी आशिरगडे होत्या. या कविसंमेलनात गोव्याच्या रजनी अरुण रायकर आणि प्रा. सारिका अडविलकर या निमंत्रित कवयित्री म्हणून सहभागी झाल्या होत्या. रजनी रायकर यांनी गोव्याचे वर्णन करणारी तर सारिका अडविलकर यांनी देश माझा आणि मी देशाचा ही कविता सादर करून रसिकांची वाहव्वा मिळवली.

# लोह्यात आज बसवेश्वर महाराज जयंतीचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**लोहा :** आज लोहयात शिवा संघटनेच्या वतीने समतेचे पुरस्कर्ते जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज जयंतीचे आयोजन करण्यात करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही लोहा शिवा संघटनेच्या वतीने शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिवा संघटना तालुका शाखा लोहाच्या वतीने जगतज्योती महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या सार्वजनिक जयंतीचे आयोजन करण्यात येते त्या अनुषंगाने यंदा ही लोहा शहरात शिवा संघटनेच्या आज दि.२९ एप्रिल २०२३ रोजी महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या ८९२ व्या ज्योतीचे आयोजन करण्यात आले असून महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी दुपारी ३ वाजता महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेची ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक शिवमंदिर जुना लोहा ते व्यंकटेश गार्डन पर्यंत काढण्यात येणार आहे. त्यानंतर व्यंकटेश गार्डन येथे महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेची मिरवणूक झाल्यानंतर गुरुवर्य शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर, गुरुवर्य राजेश्वर महाराज अहमदपुरकर, गुरुवर्य डॉ. सिध्ददयाल शिवाचार्य महाराज बेटमोगरेकर, गुरुवर्य आचार्य गुरुराज स्वामी अहमदपूरकर यांचा गुरुपदेशाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा मनोहर धोंडे सर राहणार आहेत तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून माजी आमदार ईश्वरराव भोसीकर राहणार आहेत. प्रमुख उपस्थिती म्हणून लोहा न.पा.चे लोकनियुक्त नगराध्यक्ष गजानन सुर्यवंशी, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष हरिहर भोसीकर, सिने अभिनेते अनिल मोरे, शासकीय गुतेदार तथा सामाजिक कार्यकर्ते दता भाऊ वसमतकर, शिवा संघटनेचे राज्य उपाध्यक्ष वैजनाथ तोंडसुरे, शिवसेना नेते मुक्तेश्वर धोंडगे, काँग्रेसचे कंधार तालुकाध्यक्ष बालाजी पांडागळे, आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित रहावे असे आवाहन अध्यक्ष शुभम भाऊ घोडके, स्वागताध्यक्ष नगरसेवक शरद पाटील पवार, कार्याध्यक्ष नगरसेवक बबनराव निर्मले, सहकार्यध्यक्ष नागनाथ पाटील चुडावकर, शिवा संघटनेचे तालुकाध्यक्ष हनुमंत भाऊ शेटे, शिवा व्यापारी आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश घोडके, उपाध्यक्ष साधू पाटील वडजे, शहराध्यक्ष सुर्यकांत आणेराव, राजकुमार पिल्लोळे, सरपंच मारोतराव सोनवळे, सरपंच कैलास धोंडे, उपाध्यक्ष रवि होळगे, अंकुश पाटील कदम, अंकुश सोनवळे, माधव बरडे, दगडगावे सर, यांच्या सहित तालुका शाखा पदाअधिकारी शिवा संघटना, यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** ज्ञानदानासह इतर कार्ये करत असताना शिक्षिका आणि शिक्षकेतर महिला कर्मचारी यांनी आपल्या आरोग्याकडेही काळजीपूर्वक लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या धकाधकीच्या जीवनात नकळतपणे आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते. हाच धागा पकडून गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये 'शिक्षक विकास कार्यक्रम (फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राम)' सेल अंतर्गत महिला शिक्षिका व शिक्षकेतर महिला कर्मचाऱ्यांसाठी 'मोफत आरोग्य तपासणी शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. पंढरपूर पंचक्रोशीत अल्पावधीतच प्रसिद्ध झालेल्या डॉ. बी.पी. रोंगे हॉस्पिटल




तर्फे स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र तज्ञ डॉ.स्नेहा रोंगे यांच्या सहकार्याने स्वेरीतील महिलांच्या आरोग्यासंदर्भातील विविध समस्यांची तपासणी व निराकरण करण्यात आले.

या मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये स्त्रियांच्या मासिक पाळी, पाळीच्या तक्रारी व त्यावर उपाय, महिलांसाठी आवश्यक वैद्यकीय तपासण्या, स्त्री वंध्यत्व, श्वेतपदर (अंगावरून पांढरे जाणे), गर्भाशयमुखाचा कॅन्सर, रजोनिवृत्ती, मेनोपॉज या सारख्या आजारांवर सल्ला-मार्गदर्शन करण्यात आले. तसेच हिमोग्लोबिन तपासणी हाडांची (बीएमडी) तपासणी, गर्भाशयाची तपासणी या सोबत आवश्यकतेनुसार काही इतर तपासण्याही करण्यात आल्या. यामध्ये एचबीए १ सी, सीबीसी, टीएफटी, पॅप स्मिअर, लिपीड प्रोफाईल, लिक्विड बेस सायटोलॉजी, बीसीएल या तपासण्यांच्या समावेश आहे. या आरोग्य तपासणी शिबिरासाठी पंढरपूर मधील रोहन मेट्रो पॉलीसी लॅबोरेटरी व निदान लॅबोरेटरी मधील किरण सरवदे, वैभवी कोकाटे, संतोष पवार तसेच इतर आरोग्य सेविकांनी बहुमोल सहकार्य केले. हे आरोग्य शिबीर स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली व फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रामच्या समन्वयिका प्रा.एम.एम. भोरे यांच्या नेतृत्वाखाली अधिष्ठाता, प्राध्यापक वर्ग व प्राध्यापिका यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या मोफत आरोग्य तपासणी शिबिरात स्वेरी अभियांत्रिकीच्या जवळपास १३० प्राध्यापिका व महिला कर्मचारी यांनी सहभाग घेतला.






# पैठणला रेणुकामाता मल्टिस्टेटच्या वर्धापन दिनानिमित्त शिबिर संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** येथील रेणुकामाता मल्टिस्टेट शाखेच्या वर्धापनदिनानिमित्त नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते सकाळी ११ ते ४ दरम्यान श्री रेणुकामाता मल्टिस्टेट शाखा पैठण, भाजी मार्केटसमोर येथे नेत्र तपासणी उपक्रम घेण्यात आला यात शेकडो नागरिकांनी नेत्र तपासणीचा लाभ घेतला. रेणुकामाताचे मल्टीस्टेटचे संस्थापक चेअरमन डॉ. प्रशांत चंद्रकांत, जनरल मॅनेजर गणेश गाढे, प्रसाद कचरे व्यवस्थापक व कर्मचारी अनिकेत पुरी, यांच्या सहकार्याने ललिता चौधरी, राजेंद्र कमानदार व दीपक जटाळे यांनी हा कार्यक्रम यशस्वी पार पाडला. यावेळी तालुक्यातील विविध शेत्रातील मान्यवर तसेच खातेदारांनी पैठण शाखेत भेटी देवुन शुभेच्छा दिल्या.

